



अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार दि. ६ डिसेंबर २०२२ | वर्ष : २१ वे | अंक : ७० वा | किंमत : ५ रुपये | पाने ८


### इंग्लंडचा पाकिस्तानवर विजय



**पाकिस्तान** : पाकिस्तान आणि इंग्लंड यांच्यात रावलपिंडी स्टेडियममध्ये खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात काटे की टक्कर पाहायला मिळाली. या सामन्यात दोन्ही संघांनी एकमेकांना कडवी झुंज दिली. पण अखेरीस ओली रॉबिन्स आणि अँडरसनच्या भेदक माऱ्यापुढं पाकिस्तानच्या फलंदाजांनी गुडघे टेकले. हा सामना इंग्लंडच्या संघानं ७४ धावांनी जिंकत तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतलीय. पाकिस्तानला हा सामना जिंकण्यासाठी ३४२ धावांची गरज होती. पण या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानचा संघ २६८ धावांवर ढेपाळला.

### चिखर्डे येथील दिव्यांग मृत्युप्रकरणी सीईओ चौकशी करून देणार अहवाल

# दिव्यांग मुलगीही गेला, मुलगाही गेला; उपोषणकर्त्या वडिलांच्या हाती आश्वासने आली

सुराज्य/बार्शी

**ग्रामपंचायतीकडून दिला जाणारा दिव्यांगासाठीचा निधी मिळत नसल्याकारणाने चिखर्डे(ता.बार्शी) येथील रामचंद्र कुरूले यांनी पहिल्यांदा उपोषण केले; तेव्हा उपोषणादरम्यानच त्यांची मुलगी मरण पावली. त्यावेळी खडबडून जागे झालेल्या प्रशासनाने त्यांच्यावर आश्वासनांची खैरात केली. मात्र हाती काहीच लागले नाही म्हणून कुरूले कुटुंब पुन्हा चक्क स्मशानभूमीत उपोषणाला बसले. यावेळी त्यांचा दहा वर्षाचा मुलगा उपोषणस्थळीच मरण पावला. त्यानंतर पुन्हा प्रशासनाकडून आश्वासने मिळाली. ज्याच्यासाठी उपोषण केले; ती दोन्ही मुले गेली; त्यानंतरही उपोषणकर्त्या वडिलांच्या हाती फक्त आश्वासनेच आली, असा प्रकार घडला आहे.**



आपल्या विविध मागण्यांसाठी १५ दिवसांपासून चिखर्डे येथील रामचंद्र कुरूले हे त्यांच्या सहकाऱ्यांसमवेत गावातील स्मशानभूमी येथे साखळी उपोषण सुरू केले होते. या साखळी उपोषणादरम्यान दि. ४ रोजी उपोषणकर्ते रामचंद्र कुरूले यांचा मुलगा संभव (वय १०) याचा मृत्यू झाला. दरम्यान, या प्रकरणी आंदोलनकर्त्यांनी यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई झाल्याशिवाय अंत्यसंस्कार न करण्याची भूमिका घेतल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चिखर्डे येथे भेट देऊन आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली. दरम्यान, याप्रकरणी बार्शीचे गटविकास अधिकारी यांना सक्तीच्या रजेवर पाठवले की ते वैद्यकीय रजेवर गेले याबाबत संभ्रम असून कुर्डूवाडीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे कार्यभार सोपविण्यात आला आहे. तसेच याबाबत चौकशी समिती नेमून अहवाल पाठविण्यात येणार आहे. शासनाने दिव्यांगासाठी जि.प.पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या स्वउत्पन्नातून दिव्यांगासाठीच्या ५ टक्के निधीमधून अपंगासाठी कोणत्या योजना हाती घेण्यात याव्यात याबाबत सर्व अधिकारी जि.प., पं.स. ग्रामपंचायत यांना देण्यात आले आहेत. त्यानुसार संबंधित संस्थांनी आपल्या स्वनिधीतील जमा रक्कमेपैकी ५ टक्के निधी अपंगासाठी खर्च करणे अपेक्षित आहे. चिखर्डे येथील रामचंद्र कुरूले यांची वैष्णवी व संभव ही दोन अपत्ये दिव्यांग. त्यांनी तीन महिन्यापूर्वी दिव्यांगासाठीच्या निधीसाठी असेच उपोषण केले होते. त्यावेळी त्यांची अल्पवयीन मुलगी वैष्णवी हिचा उपोषणादरम्यान मृत्यू झाला होता. त्यावेळी मुख्यमंत्री सहायता निधीमधून मदतीबाबतचे आश्वासन दिले होते. ही आश्वासने पाळली नाहीत असे आंदोलनकर्ते रामचंद्र यांचे म्हणणे आहे. त्यामुळे मागील १५ तारखेपासून ग्रामपंचायतीसमोर उपोषणाला परवानगी न मिळाल्याने त्यांनी गावातील स्मशानभूमी येथे साखळी उपोषण सुरू केले होते. या साखळी उपोषणादरम्यान तहसील प्रशासनाने त्यांची भेट घेऊन तुमचा मुख्यमंत्री सहायता निधीतून मदतीबाबतचा प्रस्ताव दुरुस्त करून पुन्हा पाठवल्याचे सांगून उपोषणापासून संबंधितांना परावृत्त करण्याचा प्रयत्न केला परंतु आंदोलनकर्ते त्यांच्या म्हणण्यावर ठाम होते.

या दरम्यान त्यांचा मुलगा संभव याचा दि. ४ रोजी मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूस प्रशासनच जबाबदार असल्याचा आरोप मृताच्या नातेवाईकांनी केले. चिखर्डे येथील दिव्यांग मुलाच्या कुटुंबीयास प्रशासनाकडून न्याय मिळाला नाही.

या कारणास्तव प्रहार संघटनेच्या जिल्हाध्यक्षा संजीवनी बारंगुळे यांनी चिखर्डे येथे आत्मदहनाचा प्रयत्न केला. परंतु प्रशासनाने वेळीच हस्तक्षेप केल्याने अनर्थ घडला नाही. दरम्यान, चिखर्डे येथील अल्पवयीन मुलाच्या मृत्युनंतर प्रांताधिकारी हेमंत निकम यांनी दि. ४ रोजीच गावाला भेट देऊन मृताच्या कुटुंबीयांशी चर्चा केली. तहसीलदार सुनील शेरखाने, नायब तहसीलदार संजीवन मुंडे, काझी यांनी चिखर्डे येथे भेट देऊन चर्चा केली. यावेळी पांगरी पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी, कर्मचारी यांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. दि. ५ रोजी सायंकाळी नातेवाईकांची समजूत काढण्यात प्रशासनाला यश आले. संभवचा मृतदेहाचे पांगरीच्या ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण समजून येईल.

> बीडीओ बिचकुले यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे. याबाबत चौकशी समिती नेमून जि.प.चे सीईओ शासनास अहवाल सादर करणार आहेत. तसेच जि.प.चे सीईओ यांच्यासमवेत आंदोलनकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात येईल.
>
> **- हेमंत निकम, प्रांताधिकारी, बार्शी**

> दिव्यांग निधी त्यांच्या दोन्ही मुलांना मिळाला आहे. त्यांना विविध साहित्य मंजूर केले याशिवाय विविध योजनेअंतर्गत मदतीबाबतचे प्रस्ताव विविध विभागाकडे मी पाठवले आहेत. त्यांना कोणत्याही लाभापासून वंचित ठेवलेले नाही. काही विषय महसूल प्रशासनाच्या अखत्यारीतील आहेत. आमच्या स्तरावरून त्यांना जेवढी मदत करता येईल ती केली आहे. मुलांना घेऊन उपोषणाला बसू नका. त्याची काळजी घ्या असा सल्ला सुध्दा मी दिला होता. मी डेप्युटी सीईओ यांना वैद्यकीय रजा मागणीचा अर्ज दिला आहे. मी वैद्यकीय रजा घेतली आहे.
>
> **- माणिकराव बिचकुले, गटविकास अधिकारी, बार्शी**

> कुरूले कुटुंबाचा मुख्यमंत्री सहायता मधून मदतीबाबतचा प्रस्ताव दुरुस्त करून पुन्हा पाठवला आहे. आंदोलनकर्त्यांना याबाबत अवगत करून उपोषणापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांनी नोटीस स्वीकारली नाही.
>
> **- संजीवन मुंडे, नायब तहसीलदार, बार्शी**

## डोक्यात दगड घालून वडिलांचा खून करणाऱ्या मुलास जन्मठेप

**सोलापूर** : पत्नीच्या गळ्यातील मंगळसूत्र विकण्यास विरोध केल्याच्या कारणावरून जन्मदात्या वडिलाच्या डोक्यात दगड आणि काठीने मारून खून करणाऱ्या मल्लिनाथ रामचंद्र बनसोडे (वय ३२ रा.वागदरी ता. अक्कलकोट) याला जन्मठेपेची शिक्षा जिल्हासत्र न्यायाधीश एम.ए.भोसले यांनी ठोठावली.

या खटल्याची पार्श्वभूमी अशी, आरोपी मल्लिनाथ हा त्याची पत्नी आणि आई-वडिलांसह वागदरी येथे राहण्यास होता. मल्लिनाथ हा घरामध्ये पैशाच्या कारणावरून नेहमी भांडण करीत असे. १२ ऑगस्ट २०१९ रोजी आरोपीची आई शांताबाई या शेतामध्ये मजुरीसाठी गेल्या होत्या. दुपारच्या सुमारास मल्लिनाथ याने त्याची पत्नी ऐश्वर्या हिला गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र विकण्यासाठी मागत होता. त्यावेळी आरोपीचे वडील रामचंद्र बनसोडे यांनी विरोध करून सुनेला (ऐश्वर्या) घराबाहेर पाठवून दिले होते. त्यामुळे चिडून मल्लिनाथ याने वडिलांना काठीने मारहाण करण्यात सुरुवात केली. तेंव्हा त्याची पत्नी ऐश्वर्या आणि चुलते अशोक बनसोडे यांनी भांडण सोडण्याचा प्रयत्न केला. आरोपीने दगड घेऊन वडिलांच्या डोक्यात मारले. तेंव्हा रामचंद्र बनसोडे हे गंभीर जखमी होऊन जागीच मयत झाले होते. या घटनेची फिर्याद आरोपीची आई शांताबाई बनसोडे यांनी अक्कलकोट उत्तर पोलिसात मुलाविरुद्ध फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी मल्लिनाथ बनसोडे यांच्या विरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला होता. तत्कालीन पोलीस निरीक्षक विलास नाळे यांनी या गुन्ह्याचा तपास करून आरोपपत्र न्यायालयात दाखल केले होते. या खटल्यात सरकार पक्षाच्या वतीने १० साक्षीदार तपासण्यात आले.यापैकी काही साक्षीदार फितूर झाले.उलट तपासणीच्या वेळी आरोपीची आई आणि चुलता यांची साक्ष महत्त्वाची ठरली.तसेच घटनेच्या वेळी आरोपी मल्लिनाथ याच्या कपड्यावरील तसेच मयत रामचंद्र यांच्या रक्ताचे गट एकच असल्याचा प्रयोग शाळेचा अहवाल महत्त्वाचा ठरला. गुन्हा शाबीत झाल्याने न्यायालयाने आरोपीला जन्मठेपेची शिक्षा सुनावली. या खटल्यात सरकार तर्फे ॲड. गंगाधर आय. रामपुरे तर आरोपीच्या वतीने ॲड. महेश सोलनकर यांनी काम पाहिले. कोर्ट पैरवी म्हणून पोलीस शिपाई अजित सुरवसे यांनी सहकार्य केले.

## बार्शीत घटस्फोटावेळी पतीने पत्नीला कायमस्वरूपी पोटगी म्हणून दिले तीन कोटी

**बार्शी** : राष्ट्रीय वकील दिना निमित्त दि.३ डिसेंबर रोजी पती-पत्नी दरम्यान एकमेकांच्या सहमतीने असलेल्या हिंदू-विवाह कायद्यातील घटस्फोट प्रकरणी आश्चर्यकारक अशी बार्शीच्या दिवाणी न्यायालयात तडजोड होऊन पतीने पत्नीला एक रक्कमी कायमस्वरूपी पोटगी म्हणून रक्कम रुपये तीन कोटी दिल्याची ऐतिहासिक घटना घडल्याची माहिती रणरागिनीचे वकील बार्शीचे ज्येष्ठ विधिज्ञ ॲड.प्रशांत शेटे यांनी दिली आहे.

या प्रकरणाची सविस्तर हकिकत अशी की, रणरागिनी (बदललेले नांव) व राजरतन (बदललेले नांव) यांचा विवाह दि.९/०३/२०११ रोजी हिंदू-धर्मशास्त्राप्रमाणे व जाती रूढी परंपरेस अनुसरून संपन्न झालेला होता. लग्नानंतर काही महिने उभयंतांचा सुखाने संसार झाला होता. परंतु उभयंतांमध्ये म्हणजेच पती-पत्नीमध्ये वैचारिक मतभेद होऊन वाद विकोपाला गेला होता. त्यामुळे न्यायालयीन प्रकरणांची मालिका सुरू झाली. रणरागिनी ने राजरतन विरुद्ध बार्शीच्या दिवाणी व फौजदारी न्यायालयात काही केसेस दाखल केल्या. प्रथम बार्शी येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचेकडे महिलांचा कौटुंबिक छळ प्रतिबंधक कायदा नुसार ५ कोट रुपयांची मागणी आयुष्याची नुकसान भरपाई म्हणून मागणी करणारी तक्रार दाखल केली. त्यानुसार बार्शी येथील संरक्षण अधिकारी यांचे अहवाला नुसार राजरतन यास बार्शी न्यायालयात हजर व्हावे लागले. त्यानंतर रणरागिनीने बार्शी येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठस्तर येथे हिंदू-ॲडोप्शन ॲण्ड मेन्टेनन्स ॲक्ट अन्वये पुन्हा प्रचलित हिंदू कायद्यानुसार रक्कम रुपये ५ कोटी कायमस्वरूपी पोटगी म्हणून मागणी करणारा दावा दाखल केला. त्याचबरोबर बार्शी येथील मे.फौजदारी न्यायालयामध्ये रणरागिनीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अन्वये पोटगी साठी अर्ज देखील केला होता. त्याचबरोबर भा.दं.वि. कलम ४८९अ अन्वये देखील फौजदारी गुन्हा बार्शी पोलीस स्टेशन येथे राजरतनचे विरुद्ध दाखल करण्यात आला होता.



या सर्व प्रकरणाची चौकशी न्यायालयात सुरू झाली होती. राजरतन व रणरागिनी उभयता श्रीमंत प्रतिष्ठित खानदानी घराण्यातील असून दोन्ही कुटुंबातील जबाबदार ज्येष्ठ व्यक्तींनी एकत्र येऊन याप्रकरणात मार्ग काढण्याचे ठरले. दोन्ही पक्षकारांचे वकिलांनी देखील राष्ट्रीय विधिज्ञ दिनाचे महत्त्व समजून सामोपचाराची भूमिका घेतली त्यामुळे उभयंतांनी वाद विवाह संपवून कायमस्वरूपी विभक्त होण्याचा निर्णय घेऊन बार्शी येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठस्तर येथे हिंदू-विवाह कायदा कलम १३(ब) अन्वये एकमेकांच्या संमतीने विवाह विच्छेदन होऊन मिळणेसाठी घटस्फोटाकरिता अर्ज दाखल केला. राजरतन याने मोठ्या मनाने पत्नी-रणरागिनी हीस तिच्या आयुष्यभरासाठी म्हणून कायमस्वरूपी पोटगी म्हणून रक्कम रुपये तीन कोटी देण्याचे मान्य करून दीड कोटी रुपयाचे दोन डिमांड ड्राफ्ट न्यायालयातील अंतिम चौकशीचे दिवशी रणरागिनी हीस न्यायालयासमक्ष सुपूर्द केले.

उभयंतांची इच्छा विचारात घेऊन आणि पती-पत्नीचा घटस्फोटाचा निर्णय मान्य करून दिवाणी न्यायालयाचे न्यायाधीश श्री.खानोरकर यांनी उभयंतांचा घटस्फोटाचा अर्ज मंजूर केल्याचा न्यायनिर्णय दिलेला आहे. याप्रकरणी रणरागिनी तर्फे ॲड. प्रशांत शेटे, ॲड. प्रणाली शेटे आणि राजरतन तर्फे ॲड. संभाजी पाटील यांनी काम पाहिले.

## गुजरातमध्ये बीजेपी फुल्ल स्विंग

### काँग्रेसची पिछाडी, आम आदमीचा चंचूप्रवेश


**गांधीनगर** : देशाचे लक्ष लागून असलेल्या गुजरात विधानसभेच्या दुसऱ्या टप्प्यातील मतदान सोमवारी पार पडल्यानंतर लागलीच निकालाविषयीचे एक्झिट पोल बाहेर पडले असून सत्ताधारी भाजप फुल्ल स्विंगमध्ये असल्याचा निष्कर्ष आहे.२०१७ पेक्षा विक्रमी जागा जिंकून भाजप निर्विवाद बहुमत प्राप्त करून सत्तेत येईल, असा या पोलचा अंदाज आहे.

काँग्रेसची मोठी पिछेहाट झाल्याचे चित्र या पोलमध्ये दिसत असून दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल यांच्या आम आदमी पार्टीची जादू दिसत नसली तरी हा पक्ष १० जागा जिंकून गुजरातच्या भूमीवर राजकीय पताका फडकावेल, असे एक्झिट पोल म्हणते. एकूण १८२ जागा असून बहुमतासाठी ९२ जागांची आवश्यकता आहे. भाजप १२९, काँग्रेस ४३ व आम आदमी पार्टी १० जागा जिंकेल,असे एक्झिट पोल सांगते. काँग्रेस की आप? गुजरातमध्ये कोण बाजी मारणार, कोणाला किती जागा? यावर आता पैजा लागल्या असल्या तरी कोण किती पाण्यात याविषयीचे अंतिम चित्र ८ डिसेंबरला मतमोजणीतून स्पष्ट होणार आहे.

## पालिकेत ‘चिमणी’ची अंतिम सुनावणी पूर्ण

### आता निकालाकडे लक्ष

सुराज्य/सोलापूर



गेली सहा महिने विमान प्राधिकरणाच्या अहवालाच्या प्रतीक्षेत महापालिकेतील चिमणी सुनावणीला तारीख पे तारीख मिळत होती. मात्र नूतन आयुक्त शीतल तेली उगले यांनी एकाच तारखेत सुनावणी क्लोज करून अंतिम निर्णय मात्र राखून ठेवला आहे. लवकरच आदेश निघणार असून याची उत्सुकता आता शिगेला पोहचली आहे.

श्री सिद्धेश्वर साखर कारखान्याच्या अनधिकृत चिमणीबाबत महापालिकेच्या वतीने नूतन आयुक्त शीतल तेली-उगले यांच्यासमोर सोमवारी सुनावणी झाली. नैसर्गिक न्यायतत्त्वानुसार कारखान्याला म्हणणे मांडण्यासाठी तारीख देण्यात आली होती. कारखान्याचे संचालक धर्मराज काडादी यांनी सुनावणीत अंतिम लेखी म्हणणे सादर केले. यानंतर आपले काहीही म्हणणे नसल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी कारखान्याच्यावतीने अंतिम म्हणणे मांडण्यात आले. त्यामुळे आता चिमणीवर अंतिम सुनावणी घेण्यात आली. यावर अंतिम निर्णय घेतला नसून अद्याप कोणताही आदेश दिला नसल्याचेही आयुक्तांकडून सांगण्यात आले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



जेवढ दिलंय तेवढं नीट करा, असं लिहिलंय !

| कल्याण |
|---|
| 115-79-388 |

| मेन बाजार |
|---|
| 149-46-790 |

# एनटीपीसीने १३ वर्षे रखडवला २१ लाखांचा मोबदला, पुन्हा दोन दिवसांची मुदत

▪ जिल्हाधिकाऱ्यांची चारचाकी गाडी आणि फर्निचरवर जप्तीची नामुष्की

सुराज्य/सोलापूर

**शेतजमिनीच्या भुसंपादनाचा २१ लाखांचा मोबदला एनटीपीसीने तब्बल १३ वर्ष रखडवला. यापूर्वी जप्ती आल्यानंतर मोबदला देण्याची हामी जिल्हाप्रशासनाकडून घेऊन तसे लेखी पत्र दिले मात्र नऊ महिने झाले तरी मोबदला दिला नाही परिणामी सोमवारी सकाळी जिल्हाधिकाऱ्यांची चार चाकी गाडी आणि त्यांच्या दालनातील साहित्याची जप्ती साठी न्यायालयाचे बेलीफ जिल्हाधिकारी कार्यालयात पोहचले जप्तीवर शेतकरी महिला ठाम राहिल्याने जिल्हाधिकाऱ्यांची एकतरी खुर्ची घेऊन जाणार अशी ठोस भूमिका घेतल्यामुळे जिल्हाप्रशासन हतबल झाले. दोन तास बंद खोलीत खलबत झाली जिल्हाधिकाऱ्यांनी योग्य तोडगा काढत दोन दिवसाची मुदत मागितली त्यामुळे जप्तीची नामुष्की टळली आता जिल्हाधिकारी एनटीपीसीला नोटीस बजावणार आहेत.**

याबाबत अधिक माहिती अशी सविता चव्हाण (सध्या रा. मोरेश्वर हौसिंग सोसायटी, वरळे रोड, तळेगाव दाभाडे) या शेतकरी महिलेची होटगी फटाडेवाडी येथे असलेली १.८९ आर हेक्टर शेतजमीन एनटीपीसीमध्ये २००९ मध्ये भूसंपादन करण्यात आली होती. मात्र एनटीपीसी कडून देण्यात आलेली नुकसान भरपाई कमी असल्याने चव्हाण यांनी न्यायालयात एन.टी. पी.सी, भुसंपादन कार्यालय, जिल्हाप्रशासन यांच्या विरोधात दावा दाखल केला होता. यांची सुनावणी होऊन वाढीव नुकसान भरपाईची दरखाग्रस्त दिवाणी न्यायाधिश वरिष्ठस्तर यांनी २१ लाखांची जप्ती आदेश दिले होते. जिल्हाप्रशासनाने आठ महिने झाले तरी ही आश्वासन पाळले नाही त्यामुळे न्यायालयाचे बेलीफ




पुन्हा याचिका कर्ते चव्हाण, त्यांचे वकील विद्यावंत पांढरे , कपिल सुरवसे, विश्वनाथ यलशेट्टी गावडे बेलीफ जप्ती साठी जिल्हाधिकारी कार्यालयात आले. निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांची भेट घेऊन जप्ती बाबत माहिती दिली आणि याचिका कर्ते जप्तीवर ठाम राहिल्याने एक ती खुर्ची जप्त करून घेऊन जाणार अशी ठाम भूमिका शेतकरी चव्हाण यांनी घेतली. जिल्हाधिकाऱ्यांनी योग्य मध्यस्थी करत तोडगा काढला मोबदला मिळण्याचे पुन्हा लेखी आश्वासन जिल्हाप्रशासनाकडून मिळाल्याने जप्तीची नामुष्की टळली.


▪ **एनटीपीच्या अधिकाऱ्यांना झापले** : माझ्या मुलीचा विवाह आले माझ्याकडे पैसे नाहीत आज निदान जिल्हाधिकाऱ्यांची एकतरी खुर्ची जप्त करणार अशी ठाम भुमिका शेतकरी चव्हाण यांनी घेतल्याने प्रशासन हतबलक झाले सायंकाळी पाच वाजता एनटिपीसीच्या अधिकाऱ्यांना निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी बोलावून घेत चांगले झापले असून यावर तात्काळ योग्यती कार्यवाही करण्याचे आदेश दिले असल्याचे समजते

▪ **जिल्हाधिकारी घेणार बैठक** : जप्तीच्या वेळी जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर बाहेर गावी असल्याने या प्रकरणात एनटीपीसी अधिकारी आणि जिल्हाप्रशानातील अधिकाऱ्यांची बैठक घेऊन विषय निकाली काढण्याची लेखी हमी जिल्हाप्रासनाकडून मिळाली आहे. दोन दिवसात बैठक होणार आहे. मोबदलाचा विषय दोन दिवासात निकाली काढण्याचे लेखी अश्वासन जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहे.

**- विद्यावंत पांढरे (याचिकाकर्ते यांचे वकिल)**

# गुजरातचा निरुत्साह

गुजरात विधासनभा निवडणुकीसाठी दुसऱ्या टप्प्यातील मतदान पार पडले. पहिल्या टप्प्यात मतदान कमी झाले. ५६ टक्के जे मतदान झाले, ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्म व कर्मभूमीला शोभणारे नाहीच. मतदान का कमी झाले? या प्रश्नाचे उत्तर आता हळूहळू बाहेर यायला लागत आहे. गेली पंधरा वर्षे गुजरातमध्ये भाजपाची एकहाती सत्ता असूनही नागरिकांना अद्यापही रस्ते, शिक्षण, महागाई या प्रश्नांना तोंड द्यावे लागत आहे. जुहापुरा हे अहमदाबादच्या नजदीक असलेले एक गाव आहे. तेथे सुमारे पाच लाख मुस्लीम समुदायाची वस्ती आहे. ही भारतातील सर्वात मोठी मुस्लीम समुदायाची वस्ती असल्याचे सांगण्यात येते. पण येथील मुस्लीम समुदायाला अजूनही मूलभूत प्रश्नांसाठी झगडावे लागत आहे. जुहापुरा हा भाग अहमदाबादपासून वेगळा करण्यात आला. त्यामुळे मूलभूत पायाभूत सुविधांशिवाय वंचित राहावे लागत आहे. गॅस, रस्ते, ड्रेनेज आणि पाण्याची कमतरता अशा समस्यांचा सामना करावा लागतो. मुस्लीम समाजाला आर्थिक समृद्धीची गरज आहे. जुहापुरातील अनेक नागरिकांकडे मतदान ओळखपत्र नाही. त्यामुळे येथील लोक मतदानही करत नाहीत. भाजपाला मुस्लीम मतांची गरज नाही तर, काँग्रेसने त्यांना गृहीत धरले आहे. आम आदमी हा सॉफ्ट हिंदुत्वावर आधारित असल्याने त्यांनीही भागात प्रचार करणे टाळले आहे, असे सांगण्यात येते.जुहापुराप्रमाणे अन्य भागही सोयी सुविधांपासून वंचित असणार.त्यामुळेच की काय पहिल्या टप्प्यात मतदारांचा निरुत्साह दिसून आला. आता महिलांच्या बाबतीतही तेच चित्र समोर आले आहे. टप्प्यात महिलांच्या मतदानाच्या टक्केवारीत घट झाल्याचे बघायला मिळते आहे.




पहिल्या टप्प्यात ६०.७५ टक्के महिलांनी मतदानाचा हक्क बजावला असून गेल्या निवडणुकीत हा आकडा ६४.३३ टक्के एवढा होता तसेच पुरुषांच्या मतदानाच्या टक्केवारीतही घट झाल्याचे बघायला मिळते आहे. २०१७ मध्ये पहिल्या टप्प्यात ६९.०४ टक्के पुरुषांनी मतदान केले होते. मात्र, यंदा हा आकडा घसरून ६५.६९ टक्क्यांवर आला आहे. निवडणूक आयोगाच्या आकडेवारी नुसार, महिलांचे सर्वांत कमी मतदान गांधीधाममध्ये (४५.५९) झाले असून त्यानंतर अनुक्रमे गढाडामध्ये ४७.५५ टक्के, धारीमध्ये ४८.७१ टक्के तर करंजमध्ये ४८.८९ टक्के महिलांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला. दक्षिण गुजरातमधील आदिवासी भाग असलेल्या डेडियापाडा, मांडवी, महुवा, व्यारा, निझर, वासंदा आणि धरमपूर यामतदार संघांमध्ये पुरुषांपेक्षा महिला मतदारांचे प्रमाण अधिक आहे. मात्र, तरीही या भागांमध्ये महिलांनी केलेल्या मतदानाची टक्केवारी पुरुषांपेक्षा कमी आहे. पहिल्या टप्प्यात डेडियापाडा मतदारसंघात सर्वाधिक ८२.७१ टक्के मतदान झाले. मात्र, इथेही महिला मतदानाची टक्केवारी पुरुषांपेक्षा कमी आहे. महत्त्वाचे म्हणजे, महिलांनी मोठ्या प्रमाणात मतदान करावे, या उद्देशाने निवडणूक आयोगाने पिंक बूथची स्थापना केली होती. या बूथवर मतदान करण्याची सोय केवळ महिलांसाठी आहे. मोदी यांची केंद्रात आठ वर्षांपासूनची सत्ता आहे. दिल्लीच्या राजकारणात आल्यानंतर मोदींनी आपले तीन उत्तराधिकारी तिथे मुख्यमंत्री म्हणून नेमले. जरी ते दिल्लीत असले तरी गुजरातवर त्यांची बारीक नजर आहे, यात शंकाच नाही. एक-दोन महिन्यातून त्यांचा गुजरात दौरा असतो. त्या राज्यातील मोदींची क्रेझ बिलकूल कमी झालेली नाही पण, त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांनी म्हणावे तसे गुजरातच्या जनतेची मने जिंकलेली नाही. त्यांचा एकही उत्तराधिकारी आक्रमक ठरला नाही. मोदींच्या काळात विकासाचा जो गाजावाजा झाला, तो त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांच्या काळात झालेला नाही. यंदाची निवडणूक भाजपासाठी जड असल्याची चर्चा आहे. कारण आम आदमी पक्षाने भाजपासमोर कडवे आव्हान ठेवले आहे. गतवेळेस हार्दिक पटेलच्या पाटीदार आंदोलनाने भाजपाची डोकेदुखी वाढवली होती परंतु भाजपाने हार्दिकचा मासा गळाला लावून त्याला उमेदवारी दिली. त्यामुळे पाटीदार आंदोलनाची धार बोथट झाली. पाटीदार समाज भाजपाच्या मागे उभा असल्याचे सांगण्यात येते. आता भविष्यात मोदी मोदी या भावनेवर भारतीय मतदान करणार नाहीत, असे राजकीय विश्लेषकांचे म्हणणे आहे. होय, ते अगदी खरे आहे. आता लोकांना काम हवे आहे. गुजरातचा विकास झाला पण त्याचबरोबर अपेक्षा वाढत आहेत. देशातही तीच स्थिती आहे. गुजरातचा निकाल काय लागतो, त्यावरच २०२४ च्या इलेक्शनमध्ये मोदी सरकारचे भवितव्य ठरणार आहे, यात दुमत नाही.

## महानिर्वाण दिन

# महिलांचे उद्धारकर्ते डॉ. बाबासाहेब

**आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन. आजच्याच दिवशी १९५६ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या लाखो अनुयायांना दु:खसागरात लोटून कायमचे निघून गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना महापरिनिर्वाणदिनी विनम्र अभिवादन! डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभे आयुष्य दिन दलित, उपेक्षित, वंचित वर्गासाठी घालवले. या वर्गासाठी बाबासाहेबांनी जे कार्य केले, ते तर सर्वांनाच माहीत आहे. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिला वर्गासाठी जे कार्य केले, ते खूप कमी लोकांना माहीत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने महिलांचे उद्धारकर्ते आहेत पण दुर्दैवाने आजही देशातील अनेक महिलांना हे माहितही नाही. बाबासाहेबांनी महिलांसाठी जे कार्य केले, ते याआधी कोणीही करू शकले नाही.**

\- - - - - - - - - - - - - -

आपल्या पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रिया या गुलामच होत्या. स्त्रियांना गुलामीची वागणूक मिळत होती. अगदी उच्चवर्णीय स्त्रिया देखील गुलामीचेच जीवन जगत होत्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्यांनंतर स्त्रियांनाच उपेक्षित मानत होते. मातोश्री रमाबाईला लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, ‘महिलांच्या उन्नती व मुक्तीसाठी लढणारा मी योद्धा आहे. महिलांना या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी मी शेवटच्या क्षणापर्यंत लढेन. बाबासाहेबांनी त्यांचे बोल खरे करून दाखवले. ते राज्यघटनेच्या माध्यमातून. बाबासाहेबांनी राज्यघटनेच्या माध्यमातून महिलांना इतके अधिकार दिले की- जे त्यांना हजारो वर्षे आणि ३३ कोटी देवताही देऊ शकले शकले नाही. पुरुषप्रधान संस्कृती आणि मनुवादी विचारसरणीमुळे ज्या महिलांना पुरुषांच्या पायाशी स्थान होते, त्या महिला आज पुरुषांच्या बरोबरीने उभ्या राहत आहेत. भारतीय महिला आज जो मोकळा श्वास घेत आहेत, तो केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळेच घेत आहेत. यासाठी भारतीय महिलांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांना प्रातः स्मरणीय आणि वंदनीय मानले पाहिजे. नोव्हेंबर १९३८ मध्ये कुटुंब नियोजना संबंधीचे विधेयक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नांमुळेच. मुंबई विधिमंडळात आले होते. त्यांनी महिलांच्या हितासाठी व कल्याणासाठी कुटुंब नियोजनाचा मार्ग दाखवला. मूल केंव्हा पाहिजे याचे स्वातंत्र्य त्यांनी महिलांना दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताचे मजूर मंत्री असताना त्यांनी महिला सक्षमीकरणाचे अनेक निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली. खाण कामगार महिलेला प्रसूती भत्ता, कोळसा खाणीत काम करणाऱ्या महिलांना पुरुषांइतकिच मजुरी, बहुपत्नीत्वाला कायद्याने बंदी, मजूर व कष्टकरी महिलांना २१ दिवस किरकोळ रजा, एका महिन्याची हक्काची रजा, दुखापत झाल्यास नुकसान भरपाई आणि वैद्यकीय रजा, महिलांना पगारी प्रसूती रजा, २० वर्षे सेवा करुन निवृत्त झाल्यावर मरेपर्यंत निवृत्तिवेतन असे महिलांसाठी अनेक क्रांतिकारक निर्णय त्यांनी मजूरमंत्री असताना घेतले. बाबासाहेबांनी १९४७ साली कायदा मंत्री असताना हिंदूसंहिता विधेयक अर्थात हिंदू कोड बिलाचा प्रस्ताव संसदेत मांडला. हे विधेयक क्रांतिकारी होते. हिंदू वैयक्तिक कायद्यात एकाच वेळी परस्परपूरक पुरोगामी तत्वे समाविष्ट करण्याचे हे क्रांतिकारक पाऊल होते. अस्पृश्यतेचे उच्चाटन, लग्नासंबंधातील स्त्री पुरुष समानता, नवऱ्याने केलेल्या अन्याय अत्याचाराविरोधात दाद मागण्याचा अधिकार, महिलांना घटस्फोट घेण्याचा अधिकार, वारसा हक्काचा लाभ महिलांनाही देण्याची तरतूद इत्यादी तत्वे या बिलात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाविष्ट केली होती. डॉ. बाबासाहेबांच्या मते सामाजिक न्यायाचा लढा यशस्वी होण्यासाठी हिंदू समाजाचा वैयक्तिक कायद्यामध्ये जाती व्यवस्था आणि पुरुषप्रधानता यांना नकार देऊन समान वैयक्तिक संबंधांची पायाभरणी करणे आवश्यक आहे. दुर्दैवाने या विधेयकाला संसदेत प्रचंड विरोध झाला. सुरुवातीला पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरुंचा या विधेयकाला पाठींबा होता पण काँग्रेसमधील सनातनी विचाराच्या नेत्यांनी



या विधेयकाला प्रखर विरोध दर्शवल्यानंतर पंडित नेहरुंनी हे विधेयक मागे घ्यावे अशी विनंती बाबासाहेबांना केली.

देशाची राज्यघटना बनवताना बाबासाहेबांनी जितकी मेहनत घेतली होती तितकीच मेहनत हे विधेयक बनवताना बाबासाहेबांनी घेतली होती. त्यामुळे बाबासाहेबांना खूप वाईट वाटले. हिंदू कोड बिलाला होणारा विरोध बाबासाहेबांसाठी खूप त्रासदायक ठरला. शेवटी या मुद्द्यावरुन त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. कोणतीही चळवळ महिलांशिवाय पूर्ण होऊ शकत नाही, सामाजिक क्रांती करायची असेल तर त्यात महिलांचा समावेश असावाच असे बाबासाहेबांचे मत होते. म्हणूनच त्यांच्या सर्व आंदोलनात महिलांचा समावेश होता मग ते १९२७ चे चवदार तळ्याचे आंदोलन असो की १९३० च्या नाशिकमधील काळाराम मंदिरातील आंदोलन असो.

१९४२ च्या नागपुरातील महिला परिषदेत महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. लग्न हे मुलींच्या प्रगतीत अडसर ठरू नये. मुलीवर लग्न लादू नये ते तिच्या संमतीनेच व्हावे. लग्नानंतर बायको ही नवऱ्याची गुलाम नको मैत्रीण बनायला हवी. पतीच्या संपत्तीत पत्नी देखील समान वाटेकरी आहे. पत्नीच्या सुरक्षेची जबाबदारी पतीची असून तिला शारीरिक किंवा मानसिक त्रास जर पतीने दिला तर त्याला कायद्याने शिक्षा व्हायला हवी, असे त्यांचे मत होते.

भारतीय राज्यघटना लिहिताना डॉ. आंबेडकरांनी राज्यघटनेच्या कलम १४, १५, १५(३), १६(२), ३९(क), ३९(घ), ३९(ड), ४२, ३२५ इत्यादी कलमांचा अंतर्भाव करून महिलांचे हित व कल्याण जोपासण्याचा प्रयत्न केला आहे. दुर्दैवाने देशातील महिला आजही बाबासाहेबांच्या या कार्याविषयी अनभिज्ञ आहेत. बाबासाहेबांचे भारतीय स्त्रियांवर अनंत उपकार आहेत. बाबासाहेबांनी महिलांसाठी इतके करून ठेवले आहे की अनेक जन्म घेऊनही हे उपकार फिटणार नाही.

**- श्याम ठाणेदार, पुणे.**

## टुडेज ब्लॉग

# शिक्षणाचा पराभव!

समाजात पोलीस, न्यायालय आणि तुरुंगांची संख्या कमी होत असेल तर तो शिक्षणाचा परिणाम मानला जातो. आपल्याकडे तुरुंगांची संख्या कमी होण्याची चिन्हे दिसत नाहीत. उलट सातत्याने त्यात वाढ होताना दिसत आहे. त्याचा अर्थ शिक्षणाचा वाढलेला आलेख शिक्षणाची उद्दिष्टे आणि समाजमनाच्या अपेक्षा पूर्ण करणारा नाही. समाजाच्या विकासात शिक्षणाचा फारसा परिणामकारक हातभार लागत नाही, हे दुर्दैवाने समोर आले आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केलेली खंत देशातील धोरणकर्ते आणि शिक्षणात कार्यरत सर्वांना आत्मचिंतन करायला लावणारी आहे. आज आपल्याला आत्मभान आले नाही तर उद्याचे भविष्य अंधारमय असणार आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही. मुर्मू यांनी संविधान दिनानिमित्त न्यायवृंदासमोर बोलताना म्हटले की, आणखी तुरुंग बांधणे यात कसला आला विकास? त्यांच्या या विधानाचा अधिक गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. त्या देशाच्या राष्ट्रपती आहेत. या देशाचे वास्तव चित्र त्यांना अधिक ठाऊक आहे. त्यामुळे इतरांसारखे त्यांच्या मताला दुर्लक्षित करून पुढे जाता येणार नाही. दुसरीकडे साक्षरतेचा आलेख उंचावत आहे आणि देशात तुरुंगांची संख्या वाढत आहे. याचा एकमेकाशी काही संबंध आहे का? ते जाणून घ्यायला हवे.

एकीकडे शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाने मोठ्या प्रमाणात साक्षरतेचा आलेख उंचावत आहे. उच्च शिक्षणात फार नाही तरी सुमारे ३० टक्के विद्यार्थी प्रवेशीत होत आहेत. प्राथमिक शिक्षणात सुमारे ९० टक्क्यांहून अधिक पटनोंदणी होत आहे. एकीकडे शिक्षणाचा आलेख उंचावणे आणि त्याचवेळी देशात तुरुंग, न्यायालय आणि पोलिसांची संख्या वाढणे हा शिक्षणाचा पराभव आहे. समाजात पोलीस, न्यायालय आणि तुरुंगांची संख्या कमी होत असेल तर तो शिक्षणाचा परिणाम मानला जातो. आपल्याकडे तुरुंगांची संख्या कमी होण्याची चिन्हे दिसत नाहीत. उलट सातत्याने त्यात वाढ होताना दिसत आहे. त्याचा अर्थ शिक्षणाचा वाढलेला आलेख शिक्षणाची उद्दिष्टे आणि समाजमनाच्या अपेक्षा पूर्ण करणारा नाही. समाजाच्या विकासात शिक्षणाचा फारसा परिणामकारक हातभार लागत नाही, हे दुर्दैवाने समोर आले आहे. आज आपल्याला आत्मभान आले नाही तर उद्याचे भविष्य अंधारमय असणार आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

समाजात शाळांची निर्मिती करताना शहाणपणाच्या पेरणीची अपेक्षा होती. शिक्षण संस्थांनी समाजात मूल्य आणि संस्कारांची पेरणी करायची असते. शिक्षण घेतलेला माणूस अधिक विवेकी, शहाणा असायला हवा असतो. शिक्षणाच्या प्रक्रियेत आलेल्या प्रत्येक बालकाच्या सुप्त गुणांचा विकास आणि व्यक्तिमत्त्वाला आकार देण्याची शाळांची जबाबदारी आहे. या देशाच्या लोकशाही व्यवस्थेसाठी जबाबदार नागरिक शिक्षणाने घडवायचा असतो. शिक्षण घेतलेला माणूस अधिक राष्ट्रप्रेमी असायला हवा. शिक्षणातून समग्र परिवर्तनाची अपेक्षा आहे. कोणत्याही देशाच्या विकासाची प्रक्रिया शिक्षणाशिवाय पुढे जात नाही, असे म्हटले जाते.




देश प्रगत करायचा असेल तर केवळ भौतिक विकास करून आपल्याला प्रगत राष्ट्र होता येणार नाही. राष्ट्राची प्रगती ही समाजाच्या शहाणपणावर अवलंबून असते. त्यासाठी शिक्षणातून समाजमनात विवेक, निर्मळता, शास्त्रीय दृष्टिकोन आणि स्वातंत्र्याची भावना कितपत रुजली हे महत्त्वाचे आहे. आपण उत्तम समाज निर्माण केल्याशिवाय आपल्याला विकासाची फळे चाखता येणार नाही. उत्तम समाज निर्माण करण्याचे शाळा आणि शिक्षण हे एकमेव साधन असल्याचे जगभरात मान्य करण्यात आले आहे. त्याचवेळी जगातील दैन्य, दारिद्र्य नष्ट करण्यासाठी शिक्षणाशिवाय दुसरा उपाय नाही हे जगातील अनेक अर्थतज्ज्ञांनी सूचित केले आहे. त्यामुळे शिक्षणातून या गोष्टी घडायला हव्यात.

जे घडायला हवे आहे, ते घडताना दिसत नाही. म्हणून देशात तुरुंग कमी पडत आहेत. राष्ट्रपतींनी व्यक्त केलेली खंत काय सांगते हे लक्षात घेतले तर आपल्या शिक्षणाचा पराभव झाला आहे हे सहजतेने लक्षात येईल. शिक्षण घेतलेला माणूस शहाणपणाने वागेल अशी अपेक्षा असतेच. त्याच्या व्यक्तिमत्त्वाला योग्य पैलू पडावे म्हणून शाळा, अभ्यासक्रम आणि शिक्षक असतात. शिक्षण देण्यासाठी अभ्यासक्रम, पाठ्यक्रम विकसित केला जात असतो. तो अभ्यासक्रम विकसित करताना गाभाघटक, जीवन कौशल्य, मूल्य यांचा गांभीर्याने विचार केला जात असतो. तुरुंगांची संख्या वाढणे म्हणजे समाजात संघर्ष, द्वेष, भ्रष्टाचाराचे प्रमाण उंचावणे आहे. हे खरे आहे की आपणाला जेव्हा पोलीस अधिक हवे असतात याचा अर्थ कायद्याचे पालन न करणारी माणसं आणि संघर्ष अधिक आहे. त्यातून न्यायालयांची गरज वाढत जाते. भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढत आहे. समाजाचा पैसा आणि संस्थांमध्ये काम करताना आपण विश्वस्त असतो, ही गांधी विचाराची भावना संपुष्टात आली आहे. आपण आपलाच समाज आणि राष्ट्रबांधवांना लुटत आहोत. त्यातून विकासाचे चित्र दूर जात आहे. त्यामुळे शहाणपणा आणि विवेक निर्माण केल्याशिवाय आपल्याला सुयोग्य वाटेचा प्रवास करता येणार नाही. त्यामुळे आज शिक्षणाचा पराभव दिसत आहे. अशा वेळी अधिक गंभीरपणे पावले टाकण्याची गरज आहे.

**- संदीप वाक्चौरे.**

## बोधकथा

# गरज सरो, वैद्य मरो...



एकदा एका श्रीमंत माणसाचा एकुलता एक मुलगा खूप आजारी पडला. त्या श्रीमंत माणसाने तऱ्हेतऱ्हेचे वैद्य केले. साधू संतांचे उपाय केले, तरी उतार पडेना. शेवटी एक विद्वान वैद्य त्याच्याकडे आला. त्याने मुलाला तपासले व बरे करण्याची हमी दिली.

तेव्हा त्या श्रीमंताने वैद्यराजांना सांगितले, ‘वैद्यराज! माझ्या मुलाला काही करून बरे करा. तुम्ही जर माझ्या मुलाला बरे केलेत तर माझी सर्व इस्टेट मी तुम्हांला देईन. वैद्यराजांनी खूप मेहनत करून एका महिन्यात त्याच्या मुलाला पूर्ण बरे केले आणि त्या श्रीमंतास आपले वचन पाळण्यास सांगितले. आता तो गृहस्थ बदलला. वैद्याला म्हणाला, ‘वैद्यराज! भलतेच काय मागता? आपणाला वेड तर लागले नाही ना! अहो, त्रासलेला माणूस असे बोलून जातो, ते सगळे खरे मानायचे असते का? माझ्या मुलाची स्थिती पाहून मी त्यावेळी वेडा झालो होतो आणि त्या वेडाच्या भरात मी आपणास भलतेच काही कबूल केलेही असेल. पण वेडेपणात दिलेले वचन शहाणपणात पाळायचे नसते’. त्याने त्या वैद्याला काहीही दिले नाही. **तात्पर्य : जगात माणसे गरजेपुरते काहीही कबूल करतात. गरज सरली, की सोयीस्करपणे बदलतात.**

## जन्म हा अखेरचा

# धर्माचारस्थल - ४



तेथेच आपण जाऊन बसलो तर त्या बिचाऱ्यांना शेवटी तरी आपले दर्शन घडेल. जीवांवर अशी कृपा करण्यासाठी भगवान शिव स्मशानात जाऊन बसले आहेत.

ज्ञान प्राप्त करण्यासाठी वैराग्याची आवश्यकता असते. स्मशान हे असे स्थान आहे की, जेथे बसल्यावर मनुष्याच्या अंगी वैराग्य सहज बाणू शकते. एक माणूस मरतो तेंव्हा त्याला अंतिम निरोप देण्यासाठी हजारो माणसे स्मशानात जातात. कामधंदा सोडून इतक्या लोकांनी स्मशानात जाण्याची काय आवश्यकता आहे? प्रेताला खांदा द्यायला चार माणसे गेली तरी काम भागण्यासारखे आहे. परंतु एवढी माणसे जातात याचे हे एक कारण आहे की, तेथे गेल्यावर माणसाला थोडे फार ज्ञान आणि वैराग्य यांचा लाभ होतो. मृत शरीर गाडताना पाहून एके दिवशी आपल्याला देखील इथेच यायचे आहे, याचे भान माणसाला येते. याप्रकारे स्मशानात अनेकदा जाऊन त्याला वैराग्य आणि ज्ञान प्राप्त होते. परंतु हे वैराग्य क्षणिक असते आणि फार तर स्मशानातून घरी जाईपर्यंत टिकते. म्हणून या क्षणिक वैराग्याला ‘स्मशान वैराग्य’ असेही म्हटले जाते. गौतम बुद्धांकडे जेंव्हा दीक्षा घ्यायला कुणी येत असे तेंव्हा ते त्याला सहा महिने स्मशानात राहायला सांगत. कारण तेथे राहिल्यावर रोज येणारी प्रेते पाहून पाहून त्याच्या मनातील वैराग्य दृढ होत असे. **(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

### मालिकांमधून कोणते प्रबोधन होते?

टीव्ही मालिकांतून आता जे काही पाहण्यास मिळत आहे त्यातून कोणते प्रबोधन होते? उलट चांगले वागून काही उपयोग नाही हेच विचार मनावर ठसत आहेत. यातून परिस्थितीत सुधारणा कशी होणार? वेगवान धावत्या जगात आपल्या मनाचा सेन्सॉरच यावर नियंत्रण ठेवू शकेल असे वाटते.

### प्रगतीचा आभास

अलिकडच्या काळात देशप्रेम दाखवण्यासाठी व फोटोसाठी उपक्रम होतात. स्वछता, नियमपालन, पर्यावरण भान, मदतीची भावना या गोष्टी हरवत आहेत. महागाई, बेरोजगारी वाढत असताना विकासाच्या आकडेवारीतून प्रगतीचा आभास दाखवताना सर्वसामान्य माणूस कसा जगत आहे? याची जाणीव दिसते का? **- प्र. मु. काळे, नाशिक.**

# ध्येयपूर्ती

**ध्येय नसेल तर नुसते चालत राहण्यात काही अर्थ नसतो. मग कसं काय ध्येय निश्चित करावं आणि त्याचा पाठपुरावा करावा याविषयी थोडक्यात सांगण्याचा आजच्या लेखातून प्रयत्न केलाय. प्रत्येकालाच ध्येय गाठायचे असते. तुम्हांलाही ध्येयपूर्तीचा ध्यास असेलच, मग त्यासाठी तुम्ही काय काय करू शकता ते एकदा नक्कीच पडताळून पाहायला हवंय.**

‘स्वप्नवत जीवन जगणे आणि स्वप्नात जगणे’ या दोन अगदी वेगळ्या गोष्टी आहेत. म्हणजे स्वत: कोणतेही कष्ट न घेता फक्त हे असं घडलं पाहिजे ते तसं झालं पाहिजे हे बोलत राहणे म्हणजे स्वप्नात जगणे आणि मोठ्या मेहनतीने, संयमाने आपली उद्दिष्टे पूर्ण करीत स्वप्नवत जीवन जगणे आहे. ध्येय गाठण्यासाठी स्वप्न आणि कल्पनांमधून बाहेर पडून प्रत्यक्ष कृतिशील बनायला हवे.

ध्येय निश्चित केल्यानंतर बऱ्याच वेळा थेट परिणामांवर लक्ष दिले जाते. ध्येयपूर्ती झाल्यावर काय काय होईल या जर तरच्या जगात वावर सुरू होतो. ज्याने लाभ तर काहीच नाही, परंतु वेळेचा अपव्यय होतो एवढे मात्र नक्की. मग त्याऐवजी तिथंपर्यंत पोहोचण्याच्या मार्गावर लक्ष केंद्रित केले तर परिणाम निश्चितच चांगले मिळतील.

दुसरा क रतोय म्हणून एखादे काम केले की- माणसाचा रोबोट झालाच म्हणून समजा. त्यापेक्षा समजून उमजून काम केले तर ध्येय गाठणे सहज शक्य होईल. मग त्यासाठी आवडीचे काम निवडा. त्यानंतर आयुष्यात तुम्हांला एकही दिवस काम करावे लागणार नाही. कोणत्या कामासाठी किती वेळ द्यायचा आणि कुठे थांबायचे हे कळायला हवे. कुठे थांबायचे हेच माहीत नसल्यास तुम्ही तुमची शक्ती वाया घालवाल. आपण यांत्रिक युगात वावरत आहोत. त्यामुळे इथे प्रत्येक वेळी इंधनाची आवश्यकता असते. मग गाडीला ज्याप्रमाणे इंधन लागते, त्याप्रमाणे मानवी शरीरालासुद्धा इंधन लागते. मग हे इंधन आपल्या व आजूबाजूच्या सकारात्मक ऊर्जेमुळे मिळत असते. थोडं थांबल्याने आपला झालेला प्रवास आपल्याला आठवता येतो, झालेल्या चुका टाळता येतात आणि मुख्य म्हणजे तिथून दिसणारा आपला रस्ता अगदी आखीव रेखीवपणे पाहता येतो.

प्रबळ इच्छाशक्तीसाठी प्रत्येक मनुष्य धडपडत असतो. इच्छाशक्ती एकवटणे तसे कठीण काम. आज ध्येयापासून दूर नेणाऱ्या इतक्या गोष्टी आहेत की- त्यातून स्वत:ला सावरणे अवघड असते. स्वत:ला योग्य मार्गावर ठेवायचे असेल तर छोट्या छोट्या गोष्टींचा सराव केला पाहिजे. याच छोट्या गोष्टी मोठे बदल आयुष्यात घडवून आणतात. एखादी छोटी सवय जर बदलायची असेल



तर त्या बदलाविषयी स्वत:ला नेहमी सांगत राहा. वाईट व्यसन तुम्ही करीत असाल आणि मनापासून सोडू इच्छित असाल तर मनाला सतत सांगत जा की, मला हे सोडायचं आहे. स्वत:वर ताबा ठेवण्यासाठी छोट्या छोट्या गोष्टी सतत करत जा. याने इच्छाशक्ती वाढेल आणि नक्कीच फायदा होईल. तुम्ही प्रत्येक गोष्ट पूर्ण करण्याच्या मागे लागाल तर इतर कामे तशीच राहतील. त्यामुळे एका वेळी एकच काम हाती घ्या आणि पूर्णत्वास न्या. एक समस्या दूर करण्याऐवजी एक पाऊल यशस्वीरित्या टाका. यामुळे पुढे जाता येईल. लक्षात ठेवा की यशस्वीपणाने टाकलेले एक छोटे पाऊल तुमचे अख्खे जीवन बदलून टाकू शकते.

आपण जेवढी अधिक आपली प्रगती साधत राहाल, तेवढे अधिक कामाशी जोडले जाल. असे करताना आपण इतरांची मदत घेऊ शकता. स्वत:ला मोनिटर करीत राहिल्याने स्वत:मधील बदल कळतात व अजून कशी प्रगती साधू शकतो हेदेखील समजते. चूक झाली तर त्यात बदल करू शकतो. चुकलात आणि त्यात सुधारणा केली नाही तर ती तुमची चूकच मानली जात असते.

ध्येय गाठणे अवघड वाटल्यास प्रयत्नांत बदल करायला हवा, ध्येयात नाही. ही साधी गोष्ट आपल्या लक्षात येत नाही आणि मग साधे सरळ आयुष्य अवघड होऊन बसते. खरे पाहायला गेले तर जीवन सोपे आहे, पण त्याला अवघड बनवणारे आपणच असतो. आपल्या आत डोकावून पाहिल्यास त्यात काही चुकीचे आढळत नसल्यास मग काळजी कशाची? भीती का? भीतीच्या दुसऱ्या बाजूला खरे यश असते. वैयक्तिक ऱ्हासाचे कारण बनण्यापेक्षा स्वत:ची ध्येयपूर्ती करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जगाला सुधारण्यासाठी आधी देशाला सुधारायला हवे.

देशाला सुधारण्यासाठी आधी कुटुंबाला सुधारले पाहिजे. कुटुंबाला सुधारण्याआधी स्वत:च्या आयुष्याला सुधारले पाहिजे. त्यामुळे सुरुवात करायचीच असेल तर स्वत:च्या आयुष्यापासून करा.

**- निकिता गांगुर्डे.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर
(१४ एप्रिल १८९१ - ६ डिसेंबर १९५६)

६ डिसेंबर
महापरिनिर्वाणदिन

# अभिवादन प्रज्ञासूर्याला, मानवतेच्या मूर्त स्वरूपाला!



- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या इंदू मिल येथील स्मारकाचे काम प्रगतिपथावर.
- स्मारकाचे प्रवेशद्वार, इमारत, व्याख्यान वर्ग, ग्रंथालय, तळमजल्यामधील वाहनतळाचे ५० टक्क्यापेक्षा अधिक काम पूर्ण.
- या स्मारकात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य पुतळा त्याशिवाय सुसज्ज वाचनालय, वाहनतळ व बसण्याची व्यवस्था, मोठे सुसज्ज सभागृह तयार करणार.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या २५ फूट पुतळ्याच्या प्रतिकृतीस लवकरच मान्यता देणार.
- ४.८ हेक्टर क्षेत्रफळ जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक साकारत असून या प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु.१०९० कोटी.
- भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे वास्तव्य असलेल्या दादर येथील हिंदू कॉलनी परिसरातील 'राजगृह' निवासस्थानाच्या ऐतिहासिक ठेव्याचे जतन.




**श्री. नरेंद्र मोदी**
मा. प्रधानमंत्री



**श्री. देवेंद्र फडणवीस**
मा. उपमुख्यमंत्री

**श्री. एकनाथ शिंदे**
मा. मुख्यमंत्री

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन



## दाते प्रशालेतील सानिका बिचुकले बुध्दिबळ स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम

सुराज्य/नातेपुते : वडवळ (जि. सोलापूर) येथे झालेल्या बूध्दिबळ क्रिडा प्रकारात नातेपुते येथील डॉ. बा, ज. दाते. प्रशालेची विद्यार्थीनी सानिका बिचूकले बूध्दिबळ या क्रिडा प्रकारात जिल्हात प्रथम येऊन विभागीय स्पर्धेतसाठी निवड झाली आहे, सानिका बिचुकले ही विद्यार्थिनी इयत्ता बारावी मध्ये शिकत असून तिला क्रीडाशिक्षक राजेंद्र काळे, बापुराव मोहिते, कू. रीतु पिसे, सतिश राऊत, अमोल पिसे यांनी मार्गदर्शन केले. या विद्यार्थीनिस संस्थेचे मार्गदर्शक सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमूख, नातेपूते एज्यूकेशन सोसायटींचे चेअरमन डॉ. एम. पी. मोरे. सचिव विरेंद्र दावडा, सभापती तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती मामासाहेब पांढरे. तसेच प्रशालेचा मूख्याध्यापक प्रविणकूमार बडवे, उपप्राचार्य भारत पांढरे उपमूख्याध्यापक विठ्ठल पिसे यांनी अभिनंदन केले.

## संगनबसवेश्वर कन्या प्रशालेत क्रिकेट स्पर्धेचा शुभारंभ

सुराज्य/मोडनिंब : श्री संगनबसवेश्वर शिवयोगी कन्या प्रशाला व कनिष्ठ महाविद्यायात तालुकास्तरीय क्रिकेटच्या स्पर्धेस दीप प्रज्वलनाने प्रारंभ करण्यात आला. यावेळी माजी जि. प. सदस्य भारत शिंदे, माजी सभापती शिवाजी कांबळे, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उमा संस्थेचे अध्यक्ष व्ही. के. पाटील, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष कैलास तोडकरी, उपसरपंच अमित कोळी, अनिल शिंदे, गुरुलिंगप्पा महाराज, प्राचार्या संगिता सुर्वे, माजी सरपंच बाबूराव सुर्वे, चांगदेव वरवडे, नागनाथ ओहोळ, सदाशिव, पाटोळे, एकनाथ सुर्वे, मोहन मोरे आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी माजी सभापती शिवाजी कांबळे यांनी तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेच्या संयोजनासाठी दिला जाणारा ५००० हजार रु. चा निधी हा अगदींच कमी असून तो वाढवून २५००० हजार रु. करण्याची मागणी केली. त्याबाबत पाठपुरावा करुन निधी वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन लेखा व वित्त अधिकारी अजय पवार यांनी दिले. या स्पर्धेत माढा तालुक्यातून मुलांचे १७ व मुलींचे ६ असे एकूण २३ संघ सहभागी झाले असून विजेत्या संघाची जिल्हा स्पर्धेसाठी निवड होणार आहे. या स्पर्धे च्या यशस्वीतेसाठी क्रीडा शिक्षक धनाजी चोपडे, देविदास परबत, प्रा. संतोष लोकरे, शंभु व्यवहारे, भैय्या पाटील, सुदर्शन कोळी, अल्ताफ शेख, सुहास चव्हाण व इतर क्रीडा प्रशिक्षक परिश्रम घेत आहेत. धनाजी चोपडे, देविदास परबत, प्रा. संतोष लोकरे, शंभु व्यवहारे, भैय्या पाटील, सुदर्शन कोळी, अल्ताफ शेख, सुहास चव्हाण व इतर क्रीडा प्रशिक्षक परिश्रम घेत आहेत.



## जिव्हाळा विद्यामंदिचे खो-खो संघाची जिल्हास्तरासाठी निवड


सुराज्य/कुर्डूवाडी : शालेय शिक्षण क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य वतीने, आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेमध्ये जिव्हाळा सुसंस्कार विद्यामंदिर कुर्डूवाडी येथील १४ वर्षे वयोगट व १७ वर्षे वयोगटातील दोन्हीही संघाने प्रथम क्रमांक मिळवीत जिल्हास्तर स्पर्धेसाठी प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान मिळवला. स्पर्धा श्रीमान लक्ष्मणराव पवार विद्यालय रोपळे येथे आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेमध्ये १४ वर्षे वयोगटात एकूण ३२ संघाने सहभाग नोंदविला होता. तर १७ वर्षे वयोगटात २४ संघाने सहभाग नोंदवला होता. यामध्ये जिव्हाळा सुसंस्कार विद्यामंदिर कुर्डूवाडी संघ अजिंक्य राहिला. १४ वर्ष वयोगट कर्णधार रोशन शिंदे, गणेश गवळी, जय शिंदे, वैभव गोफणे, चैतन्य गोफणे, विशाल गोरे, ओम वायचळ, पृथ्वीराज सावंत, सुरज राऊत, सार्थक हजारे, रोहन हजारे, प्रेम सागर सावंत, शिवम मदने, संग्राम भोसले, सुयश लोंढे, कुणाल शिरसागर, सार्थक भिसे, साईराज वायचळ, विजय राऊत, यश गाडे आदी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. तर सतरा वर्षे वयोगट प्रथमेश कुलकर्णी, विक्रम डिकोळे, सुजित सोनवणे, पियुष सालगुडे, महेश दुपारे, कुणाल हनवते, कुणाल शिरसागर, सुदेश नवगिरे, व्यंकटेश बनसोडे आधी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थापक अध्यक्ष शिवराज वायचळ, माढा-करमाळाचे आमदार संजयमामा शिंदे, माढाचे आमदार बबनदादा शिंदे, गटशिक्षणाधिकारी बंडू शिंदे, प्रशासनाधिकारी महेश पवार, केंद्र समन्वयक लक्ष्मण करंडे, सचिव अजित वायचळ, मुख्याध्यापिका सारिका गोटे यांनी अभिनंदन केले. यशस्वी विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक जयंत माळी, आकाश घोडके यांचे मार्गदर्शन लाभले.

# वाद कशाला उकरुन काढता, आहे तिथे आनंदाने राहा ना

## सीमावादावर खा. डॉ. जयसिध्देश्वर महास्वामींनी साधला 'सुवर्णमध्य'

सुराज्य/सोलापूर

सीमावाद उकरून काढण्यात काहींच अर्थ नाही. आपण जिथे आहोत, तिथे आनंदाने राहिले पाहिजे, असा उपदेश खासदार डॉ. जयसिध्देश्वर महास्वामी यांनी केला आहे. निष्कारण हा वाद कशाला उकरून काढता? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.



शेळगीतील गौडगाव मठात सोमवारी नंदीध्वज पूजन सोहळा होता. त्यांच्या हस्ते पूजन सोहळा झाला. त्यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते तसेच आपापल्या भागातील काही कामे घेवून नागरीकही मठात आले होते. त्यावेळी दै. 'सुराज्य'च्या प्रतिनिधींशी अनौपचारिक चर्चा करताना त्यांनी सीमावादावर आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, राज्यात, कर्नाटकात आणि केंद्रात भाजपची सत्ता आहे तेव्हा तिघेही बसा. हा प्रश्न मिटवा. जरी तिघेही बसले तरी हा प्रश्न मिटेल का? तो मिटणे फार कठीण आहे.

स्वातंत्र्यानंतर आतापर्यंत सीमावर्ती भागात अनेक पिढ्या होवून गेल्या. समजा सोलापूर कर्नाटकात टाकले आणि बेळगाव महाराष्ट्राला दिले. त्यातून कितीतरी प्रश्न गहन होणार आहेत. वाचन-लिखाण आणि इतर व्यवहार कसे होणार? सोलापुरात कन्नड व बेळगावमध्ये मराठी भाषिक आहेत पण कन्नड बोलणाऱ्यांना लिहिता-वाचता येत नाही तर मराठी बोलणाऱ्यांना लिहिता-वाचता येते का? असे कितीतरी प्रश्न निर्माण होणार आहेत. बंगळुरू आणि मुंबई या दोन राजधान्यांच्या अंतराचाही विचार झाला पाहिजे. सोलापूर आणि बेळगावकरांना ते शक्य आहे काय?

### विकास झाला पाहिजे...

आपल्या सीमावर्ती भागातील लोकांची जी तक्रार पुढे येत आहे, ती खरी आहे. पण आम्ही त्या प्रदेशात जावू हा आग्रह चुकीचा ठरेल. सीमावर्ती भागात विकास झाला पाहिजे ह्या मताचा मीं देखील आहे. आपल्या शेजारच्या गुलबर्गा व विजयपूरमध्ये विकास झपाट्याने होतो आहे. त्याप्रमाणे सोलापूरचा विकास झाला पाहिजे, हा आग्रह सर्वांनी धरला पाहिजे.

### पद्मशाली समाजाचा असाही आदर्श...

या चर्चेत महास्वामींनी सोलापुरातील पद्मशाली बांधवांचा आदर्श सांगितला. पूर्वभागात हा समाज लाखोंनी राहातो. त्यांचे अॅडोप्ट बघा ना. हा समाज सोलापुरात कसा गुण्यागोविंदाने राहातो. तेलंगणा आपल्या जवळच आहे पण आम्ही तेलंगणात जावू, असे या समाजाने कधीही म्हटलेले नाही, या बाबीकडेही महास्वामींनी लक्ष वेधले.

## विठ्ठल कारखान्यात अपघात; दुसऱ्या कामगाराचा मृत्यू

सुराज्य/सोलापूर : गुरसाळे येथील विठ्ठल साखर कारखान्यात काम करताना १२ फूट उंचावरून खाली कोसळून गंभीर जखमी झालेला सोमनाथ मारुती नरसाळे (वय २५रा. जळोली ता. पंढरपूर) हा सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना रविवारी रात्री मरण पावला. त्यामुळे मयताची संख्या दोन झाली आहे.

काल रविवारी सकाळी नऊ वाजेच्या सुमारास विठ्ठल साखर कारखान्याच्या बॉईलींग हाऊस येथे काम करीत असताना सुधाकर सदाशिव चौगुले हा कामगार मयत झाला होता. तर सोमनाथ नरसाळे हा गंभीर जखमी झाला होता. त्याला पंढरपूर येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात एकनाथ (भाऊ) यांनी दाखल केले होते. उपचारादरम्यान तो रात्री मरण पावला.

मयत सोमनाथ नरसाळे हा अविवाहित असून त्याच्या पश्चात आई-वडील दोन बहिणी आणि एक भाऊ असा परिवार आहे. या घटनेची प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## पीक विम्याची रक्कम खात्यावर वर्ग करण्याची प्रक्रिया सुरू : म्हेत्रे

### महसुलमंत्री विखे-पाटील यांचे सहकार्य

सुराज्य/अक्कलकोट



यावर्षीच्या अतिवृष्टीमुळे अक्कलकोट तालुक्यातील खरीप हंगामातील पिकांचे अतोनात नुकसान झाले होते. अडचणीतील शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम मिळावी यासाठी माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांनी राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे पाठपुरावा केला होता. अखेर शनिवारपासून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यावर पीक विम्याची रक्कम जमा होत असल्याची माहिती सिध्दाराम म्हेत्रे यांनी दिली.

पुढे बोलताना सिध्दाराम म्हेत्रे म्हणाले की, अक्कलकोट तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांचे संपूर्ण वर्षाचे अर्थकारण खरीप पिकांवर अवलंबून असते. मात्र यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे तालुक्यातील खरीप हंगामातील सोयाबीन, तूर, भुईमूग, उडीद, मूग यासह इतर पिकांचे अतोनात नुकसान झाल्याने शेतकरी अडचणीत आले आहेत. अडचणीतील शेतकऱ्यांना एनडीआरएफ योजनेतून अतिवृष्टीचा निधी मिळाला आहे. यावरून तालुक्यात झालेल्या नुकसानीची स्पष्टता दिसून येत आहे. संपूर्ण अक्कलकोट तालुक्यात मोठे नुकसान झाल्याने खरीपातील सर्व पिकांच्या जोखमेपोटी विमा कंपनीकडून रक्कम देण्याविषयी आदेश द्यावेत यासाठी महसूलमंत्र्यांकडे दि. १७ ऑक्टोंबर रोजी निवेदन दिले होते. यानंतर महसुलमंत्र्यांनी अक्कलकोट तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळावी यासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन दिले होते. आणि पुर्ततादेखील झाल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठे सहकार्य झाल्याचे म्हेत्रे यांनी स्पष्ट केले. तालुक्यातील ३५२१४ शेतकऱ्यांकडून खरीप हंगामासाठी विमा उतरविण्यात आला होता.

### पुन्हा म्हेत्रेंचा सत्कार


हणमगाव येथे अतिवृष्टी व पिक विम्याचे रक्कम अडचणीतील शेतकऱ्यांना मिळवून दिल्याबद्दल म्हेत्रे यांच्यावर फुलांचा वर्षाव करून शेतकऱ्यांनी आनंदोत्सव साजरा केला.

अक्कलकोट तालुक्यातील ३५२१४ शेतकऱ्यांनी खरीप हंगामपोटी विमा उतरवला होता. यापैकी २९४६८ शेतकऱ्यांनी, कृषी विभागामार्फत, टोल फ्री क्रमांकवर तक्रारी दिले आहेत. तक्रार दिलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यावर विमा कंपनीकडून रक्कम वर्ग करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून येत्या आठवड्याभरात बाधित शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम रक्कम जमा करण्याची प्रक्रिया सुरू राहील.

**– जगदीश कोळी,** (जिल्हा समन्वयक विमा कंपनी)

## शेळगीच्या समर्थ मंदिरात दत्त जयंती उत्सव

सुराज्य/सोलापूर : शेळगी येथील स्वामी समर्थ मंदिरात बुधवार दिनांक ०७ डिसेंबर रोजी दत्त जयंती निमित्त दत्त जयंती उत्सव सोहोळा आयोजित करण्यात आर्ल्ले आहे. त्या निमित्त सकाळी पहाटे ५. ३० वाजता काकडआरती, सकाळी ७ वा. ते ८. ३० वा. श्रीदत्त - पादुका पूजन, सकाळी ११. ०० वा. ते १२. ०० वा. नामस्मरण, दुपारी १२ वाजता महाआरती व नैवद्य, दुपारी १ ते रात्री ९ पर्यंत प्रसाद वाटप (प्रसाद द्रोण मध्ये दिले जाईल), सायंकाळी ६. ४५ वाजता श्रीदत्त जयंती निमित्त पाळणा आरती गुलाल व प्रसाद वाटप. प्रसादचे मानकरी : श्री. प्रफुल्ल नारायण सोनवणे, रोहन अनिल हवले, विठ्ठलदास गज्जम (स्वामी समर्थ मेडिकल), आनंद महामुनी, वल्लभ मनोज रासने (अकोले संगमनेर), नेहा चौधरी व श्री स्वामी समर्थ मंदिरतर्फे आयोजित करण्यात आले. तरी वरील सर्व कार्यक्रमांचा सर्व भक्तांनी लाभ घ्यावा, असे मंदिरचे संस्थापक अध्यक्ष हवले यांनी कळविले आहे.



## लोकमंगल बँकेच्या चेअरमनपदी आ. सुभाष देशमुख बिनविरोध

सुराज्य/सोलापूर : लोकमंगल बँकेच्या चेअरमनपदी पुनश्च आ. सुभाष देशमुख यांची बिनविरोध निवड करण्यात आली तर हाईस चेअरमन पदी प्रदीप नागणे यांची निवड करण्यात आली.

बँकेच्या प्रधान कार्यालयात सोमवारी नूतन संचालकांची बैठक पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी आबासाहेब गावडे यांच्या अध्यक्षतेखाली चेअरमन व व्हाईस चेअरमन यांच्या निवडीकरिता निवडणूक होऊन चेअरमन पदासाठी आ. सुभाष देशमुख यांचे नाव अशोक मादगुंडी यांनी सूचविले तर अनुमोदन प्रदीप नागणे यांनी दिले. व्हाईस चेअरमन पदासाठी प्रदीप नागणे यांचे नाव आ. सुभाष देशमुख यांनी सुचविले तर अनुमोदन देवानंद चिलवंत यांनी दिले. निवडणुकीसाठी दोन्ही जागेवर प्रत्येकी एक-एक अर्ज आल्याने चेअरमन पदी आ. सुभाष देशमुख व व्हाईस चेअरमन पदी प्रदीप नागणे यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी केली. यावेळी देवानंद चिलवंत, अशोक मादगुंडी, सतीश लामकाने, जॉन चोप्रा, प्रल्हाद कांबळे, अशोक सापटणेकर, निलेश पटेल, अभिजित टाकळीकर, श्री. जितेंद्र नाईक- लाड, अनंता चव्हाण, उज्वला चेळेकर, शितल कोकाटे, विजय कुलकर्णी, सिध्दार्थ सर्जे, नरेंद्र काटीकर आदी उपस्थित होते. चेअरमन आ. सुभाष देशमुख यांनी सर्व नवनिर्वाचित संचालकांसमोर बँकेच्या आर्थिक स्थितीचे विश्लेषण विशद केले. मुख्य कार्यकारी अधिकारी राजेशसिंह बायस यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## बँक ऑफ महाराष्ट्रतर्फे हिंदी दिवस साजरा



सुराज्य/सोलापूर

देशाच्या सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील एक अग्रगण्य बँक असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रतर्फे पुणे येथे हिंदी दिवस अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी ए.एस. राजीव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. नामवंत चित्रपट अभिनेत्री मृणाल कुलकर्णी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. बँकेचे कार्यकारी संचालक ए.बी. विजयकुमार व आशिष पांडे हे बँकेचे सरव्यवस्थापक, वरिष्ठ अधिकारी व देशभरातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सह या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

बँक ऑफ महाराष्ट्रच्या मनुष्यबळ विभागाचे सरव्यवस्थापक के. राजेश कुमार यांनी प्रास्ताविक केले. बँक ऑफ महाराष्ट्रच्या राजभाषा विभागाचे उपसरव्यवस्थापक डॉ. राजेंद्र श्रीवास्तव यांनी कार्यक्रमाचे सूत्र संचालन व समन्वयन केले.

## तीन सराईत गुन्हेगारांकडून ११ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

सुराज्य/सोलापूर

सोलापूर (प्रतिनिधी) तीन सराईत गुन्हेगारांकडून ११ लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, दि. १० नोव्हेंबर रोजी सकाळी जोडभावी पोलीस स्टेशन हद्दीत झालेली घरफोडी व दि. २० नोव्हेंबर रोजी विजापूर नाका पोलीस स्टेशन हद्दीत झालेली घरफोडी यात साम्य असल्याचे आढळून आल्याने त्या दृष्टीने स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील दुरगे व सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय क्षिरसागर यांनी या अनुषंगाने तपास करत असताना पुणे, सोलापूर, रायगड या जिल्ह्यातील रेकॉर्डवरील



आरोपी चंद्रकांत उर्फ चंदू माने यांनी त्याच्या इतर साथीदाराच्या मदतीने हे गुन्हे केल्याचे माहिती मिळाली. आणि त्या अनुषंगाने त्याचा शोध घेतला असता, २९ नोव्हेंबर रोजी चंदू माने आपल्या साथीदारासह पांढऱ्या कारमध्ये पूर्व विभाग चौपाटी जवळ कर्णिक नगर कडे जाणाऱ्या रोडवर थांबला आहे. अशी माहिती मिळाली. त्यावेळी सापळा लावून चंदू काळे यास कारसह ताब्यात घेतले असता त्या कारमध्ये रेकॉर्डवरील राहुल हिरामण लष्करे (रा. वाकड, पुणे) तसेच गौरव कुंडलिक घुमरे (वय-३३ रा. सिडको, नाशिक) या तिघांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी या दोन्ही ठिकाणची घरफोडी केल्याचे कबूल केले. त्यांच्या ताब्यातून ११ लाख ८०० रुपये किमतीचे चोरीस गेलेले १०० ग्रॅम सोने, १० ग्राम चांदी व घरफोडी करण्यासाठी वापरलेली कार असा मुद्देमाल जप्त केला. ही कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील दुरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय क्षिरसागर, महेश शिंदे, राजू मुदगल, कृष्णात कोळी, कुमार शेळके, महेंद्र ठोकळ, सिध्दाराम देशमुख, वसीम शेख, प्रवीण शेळकंदे यांनी केली.

## विविध मागण्यांसाठी आडम मास्तरांनी घेतली आयुक्तांची भेट

सुराज्य/सोलापूर

सोलापूर महापालिका मार्फत पाण्याचे योग्य व्यवस्थापन अद्यापही होऊ शकत नाही हे अत्यंत खेदाची बाब आहे. गेल्या वर्षी ४८ टक्के पाण्याची गळती तर यंदाच्या वर्षी ४२ टक्के पाण्याची गळती सुरूच आहे. या विषयी ठोस पावले उचलण्याऐवजी पालिका प्रशासनामार्फत नागरिकांना दिल्या जाणाऱ्या मुलभूत सुविधांमधून सार्वजनिक नळ बंद करण्याची मोहीम सुरु केली आहे. ही कारवाई तात्काळ थांबवावी, अशी मागणी माजी आ. नरसय्या आडम यांनी पालिका आयुक्त शीतल तेली उगले यांच्याकडे केली.

सोमवारी गोदुताई परुळेकर वसाहतीला साडे चार एम. एल. डी. पाणी, सार्वजनिक नळ बंद मोहीम रोखणे,



दिव्यांगाच्या विविध न्याय हक्काच्या मागण्यांसाठी आडम यांनी आयुक्तांची भेट घेतली. यावेळी हयात दाखल्या अभावी नोंदीत दिव्यांग बांधवांना कल्याणकारी निधींतून मिळणारे लाभापासून जवळपास हजारच्या घरात दिव्यांग वंचित आहेत. तसेच त्यांना मिळणार उदर्निरवाह भत्त्यात वाढ झाली पाहिजे, दिवाळीचे थकीत सानुग्रह अनुदान मिळाले पाहिजे या मागण्याबाबत मा. आयुक्त तेली यांनी महत्वाचे निर्णय घेतले.

यु.डी.आय.डी. कार्ड नसेल तर हयात दाखला दाखल केल्यास वंचित दिव्यांगाना लाभ देण्याचे आदेश संबंधित विभागाला दिले. १ जानेवारी च्या आत सानुग्रह अनुदान अदा करा, तसेच वाढीव उदरनिर्वाह भत्त्याबाबत अन्य महापालिकाचा अभ्यास करून निर्णय घेण्यात येईल तसेच कॉ. गोदुताई परुळेकर वसाहतीला साडे चार एम. एल. डी. पाणी देण्यासाठी तपासणी करून पाणी देणार असल्याचे आश्वासन दिले.


यावेळी माजी नगरसेविका कामिनी आडम, व्यंकटेश कोंगारी नसीमा शेख, नलिनी कलबुर्गी, शकुंतला पाणीभाते, सुनंदा बल्ला, युसूफ शेख, म. हनिफ सातखेड, विल्यम ससाणे, विक्रम कलबुर्गी, वसीम मुल्ला, बापू साबळे, आप्पाशा चांगले आदींची उपस्थिती होती.

### शासनस्तरावर चर्चा करून निर्णय घेऊ : आयुक्त

सार्वजनिक नळ बंद न केल्यास अमृत योजनेचा निधी मिळणार नाही. तरी याबाबत आपण शासन स्तरावर चर्चा करून निर्णय घेऊ, असे आयुक्त शीतल तेली उगले यांनी सांगितले.

## निधन वृत्त

### अनिल माळवदकर



सुराज्य/वेळापूर : वेळापूर श्रीराम गल्ली येथील रहिवासी अनिल अंबादास माळवदकर (वय ५१) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, दोन भाऊ, आई, बहीण असा परिवार आहे. ते सोसायटी सचिव माळवदकर भाऊसाहेब यांचे धाकटे बंधू होते.

### निलेश मुलीमनी



सुराज्य/सोलापूर : घोंगडे वस्ती येथील रहिवासी निलेश चुडामणी मुलीमनी (वय ४०) यांचे आकस्मित निधन झाले. त्यांच्या पश्यात पत्नी, दोन मुले असा त्यांचा परिवार आहे.


### नावात बदल

मी **(PRALHAD JAYAVANT JAGTAP) S/o** किंवा डी/ओ **(JAYAVANT)**, पत्ता : (१ भीमनगर यावली) ने माझे नाव ०१/१२/२०२२ च्या प्रतिज्ञापत्राद्वारे **(PRALHAD JAYAVNT JAGTAP)** वरून **(PRALHAD JAYAVANT JAGTAP)** असे बदलले आहे. संबंधितांनी याची नोंद घ्यावी.



## चुंगी पाटील वस्तीकरिता चार दशकतानंतर पोहचली बस

**सुराज्य/अक्कलकोट :** अक्कलकोट तालुक्यातील चुंगी पाटील वस्तीकरिता चार दशकतानंतर रापम एसटी बस पोहोचली अन् ग्रामस्थांनी श्री स्वामी समर्थांचे दर्शन व अन्नछत्र मंडळात महाप्रसाद घेवून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. दरम्यान पाटील वस्ती चुंगी बस सेवा आमदार सचिन कल्याणशेट्टी, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्‍वस्त अमोलराजे भोसले, चुंगीच्या सरपंच सारिका चव्हाण, प्रहारचे शहराध्यक्ष अमर शिरसाट, हन्नुरचे उपसरपंच सागर कल्याणशेट्टी, माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, प्रहारचे प्रवक्ते विजय तथा गोटू माने यांच्या प्रयत्नाला यश आले आहे. चाळीस वर्षात पहिल्यांदाच राज्य परिवहन महामंडळाची बस पाटील वस्ती चुंगी येथे आली असता आनंद उत्सव साजरा करण्यासाठी संपूर्ण एसटी बसचा खर्च सरपंच सारिका चव्हाण यांच्याकडून देण्यात आला. सर्व गावकऱ्यांनी एसटीमध्ये बसून श्री स्वामी समर्थांचे दर्शन व अन्नछत्र मंडळात महाप्रसाद घेऊन आनंद उत्सव साजरा केले. अक्कलकोट तालुक्याचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी चुंगीसाठी जेवढी निधी लागेल तेवढी निधी देण्याची ग्वाही दिले. लवकरच पाटील वस्ती रस्ता डांबरीकरण व हनुमान मंदिर सभा मंडपाकरिता निधी देण्यास कटीबद्ध असल्याचे आमदार कल्याणशेट्टी सांगितले. यावेळी शशिकांत फडतरे, औदुंबर गंगाधर, दिलीप फडतरे, भीम फडतरे, परमेश्‍वर कोराळे, संतोष शिरगिरे, बालाजी माळगे, संतोष फडतरे, पिल्या शेख, आमसु कुंभार, सोपान सावंत, विठ्ठल कोळी, पापू फडतरे, बाबुराव फडतरे, संजय पाटील, संतोष पाटील, दिगंबर चव्हाण, राजाभाऊ चव्हाण, संजय कोळी, विकास हातागळे, राजू मंगरुळे, रमा सुरवशे, अर्जुन शितोळे, माळाप्पा धनगर, धनराज कोळी, विकास घायाळे, राजेंद्र सुरवसे, सहदेव फडतरे, यादव मोठे, बाळू मोठे, पांडुरंग खेत्री, समीर शेख, विठ्ठल कलकोटे, दादा सुरवशे, मारुती चांभार, शिवना कुंभार, अमोल कुंभार, अनुषा मोठे, नेताजी सुरवसे, संगया स्वामी, तुकाराम देशमुख, महादेव फडतरे, शिवाजी फडतरे, दुर्योधन थोरात, हरिदास सावंत, अर्जुन फडतरे, मुत्त्या स्वामी, अप्पू स्वामी, प्रमोद फडतरे उपस्थित गावकरी उपस्थित होते.

## पिलीव बसस्थानकावर धुळीचे साम्राज्य

**सुराज्य/पिलीव :** माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील बसस्थानकावरील काम रोडवेज सोल्युशन प्रा. लिमिटेड या कंपनीने गेल्या चार वर्षापासून रखडविले आहे. बसस्थानकावरील मुख्य चौकातील व बचेरी चौकातील काम अनेक दिवसांपासून सदर कंपनीने रखडविले आहे. तसेच याठिकाणी गटारींचे काम अपूर्ण आहे. यामुळे वरून गटारीतून येणारे घाण पाणी चौकातील आडात सोडले आहे. या घाण पाण्याची दुर्गंधी अक्षरशः पूर्ण चौकात पसरतेय आणि वरून प्रचंड धूळ या दोन्हींचा त्रास विद्यार्थी, नागरिक, प्रवाशी यांना सोसावा लागत यामुळे आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. सदर रस्त्याचे काम पूर्ण करावे म्हणून पिलीव येथील नागरी आघाडीच्यावतीने रस्ता रोकोचा इशारा देण्यात आला होता. ताबडतोब काम पूर्ण करण्याचे आश्‍वासन दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले होते. त्यालाही जवळजवळ ३-४ महिने झाले तरीही काम काही पूर्ण झाले नाही.

## शुक्रवारी बोरामणीत दावलमलीक ऊरुस

**सुराज्य/सोलापूर :** बोरामणी (ता. दक्षिण सोलापूर) येथील ग्रामदैवत व हिंदू- मुस्लीम समाजाचे श्रध्दास्थान म्हणून ओळख असलेल्या हजरत पीर दावलमलीकबाबा यांचा येत्या शुक्रवार (दि. ९ डिसेंबर) रोजी ऊरुस साजरा होत आहे. प्रतिवर्षाप्रमाणे याहि वर्षी उर्सनिमित्त पंच समितीच्यावतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या गुरुवार (दि. ८ डिसेंबर) रोजी रात्री ८ वाजता गावातून विविध वाद्यांच्या गजरात संदल (गंध)ची मिरवणूक निघणार आहे. तर रात्री १२ वाजता संदलचे देवस्थानकडे प्रस्थान होणार आहे. शुक्रवार रोजी दिवसभर भाविकांसाठी दर्शन व महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. तर शनिवारी सायंकाळी ४ वाजता जंगी कुस्त्यांचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला आहे. यावेळी कुस्त्यांसाठी नामवंत मल्लांची उपस्थिती असणार आहे. सोलापूर व उस्मानाबाद या दोन्ही जिल्ह्याच्या सीमेवर असलेले हे देवस्थान बोरामणीपासून चार किलोमिटर अंतरावर आहे. त्यामुळे देवस्थानपर्यत भाविकांना जाण्या-येण्यासाठी वाहने उपलब्ध असणार आहेत. सदर उर्सला प्रतिवर्षी कर्नाटक, मराठवाडा येथील भाविकही दर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर हजेरी लावत असतात.

## कोनापुरे प्रशालेत मान्यवरांचा सत्कार

**सुराज्य/सोलापूर :** आहेरवाडी येथील श्री पंचलिंग शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मल्लप्पा कोनापुरे प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय आहेरवाडी येथे सोलापूर जिल्हा माध्य. शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्था, बाळे सोसासटीचे पंचवार्षिक निवडणूक २०२२ या निवडणुकीत निवडून आले. नूतन संचालक तथा स्वामी विवेकानंद हायस्कूल शिंगडगावचे मुख्याध्यापक सुभाष भिमणवरु यांचा सत्कार प्राचार्य तुप्पद यांच्या हस्ते करण्यात आला. प्रास्ताविक प्राचार्य जी. आर. तुप्पद यांनी केले. आभार एम. एस. पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन आर. एस. चिंचोळी यांनी केले.

# डिसेंबर अखेरीस स्वामी समर्थ कारखाना होणार सुरु

**सुराज्य/अक्कलकोट**

स्वामी समर्थ सहकारी साखर कारखान्याचा यंदाचा सन २०२२-२०२३ चा गळीत हंगाम माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक संजीवकुमार पाटील यांच्या नेतृत्वाखाली यशस्वी करण्याचा निर्धार संचालक मंडळाने केल्याप्रमाणे ९५ टक्के काम पूर्ण झाले आहे. याच डिसेंबर महिन्यात चाचणी होईल, तर अखेरपर्यंत गळीतास प्रारंभ होईल अशी माहिती संचालक अप्पासाहेब पाटील यांनी दिली.

ते गेल्या आठ वर्षापासून बंद असलेला स्वामी समर्थ सहकारी साखर कारखाना पुनःश्च चालु करणेकामी सर्व ती यंत्रणा कार्यान्वित करण्यात आल्याने आजअखेर साखर कारखान्याचे मुख्य यंत्र असलेल्या रोलरचे पूजन सोमवारी युवा नेते अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक दिलीप पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी अप्पासाहेब पाटील यांनी उपस्थितांना माहिती देताना बोलत होते. अप्पासाहेब पाटील पुढे बोलताना म्हणाले, अध्यक्ष सिद्रामप्पा पाटील हे कार्यस्थळावर ठाण मांडून आहेत. प्रत्येक विभागाची प्रत्यक्ष ठिकाणी जावून पाहणी करीत आहेत. यांत्रिक काम युध्द पातळीवर सुरु असून सुमारे ४०० हून अधिक कर्मचारी सध्या कार्यरत आहेत. मिल विभाग, बगॅस कॅरिअर, बॉयलिंग हाऊस, ज्यूस हाऊस, बॉयलर हाऊस, बॉयलर साईड न्यू ट्युब वर्क, बॉयलर आतील भागातील पुर्णत्वास येत असलेले ट्यूब वर्क, बॉयलिंग हाऊस पंप आणि व्हॉल्व वर्क, शुगर एरिया, शुगर हाऊस, पॅकेजिंग यासह सिव्हील वर्क पत्रा वर्क ही कामे पुर्णत्वास येत आहेत. डिसेंबर महिन्यात चाचणी होईल, तर अखेरपर्यंत गळीतास प्रारंभ होईल अशी माहिती संचालक अप्पासाहेब पाटील यांनी दिली. पाटील म्हणाले, नूतनीकरण करण्याचे काम प्रगतीपथावर असून कारखाना सुरु करण्याकामी राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, सहकार मंत्री ना. अतुल सावे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे (शिखर बँक) प्रशासक विद्याधर अनास्कर, साखर आयुक्त शेखर गायकवाड यांचे सहकार्य लाभत असून यांच्याकडून देखील कारखान्याच्या सुरु असलेल्या कामकाजाची आस्थेने चौकशी केली जात आहे.



याकामी कारखान्याचे अध्यक्ष सिद्रामप्पा पाटील यांची जिद्द, चिकाटी, सध्य वयाची तमा न बाळगता दररोज कार्यकारखान्याच्या कार्यस्थळी येवून प्रत्येक विभागात पोहोचून कामाची पाहणी करीत आहेत. याबरोबरच सिद्रामप्पा पाटील यांचे चिरंजीव वडिलांचे वयोमान पाहता प्रत्येकजण साखर कारखाना चालु करण्याकामी सतत कार्यरत आहेत. प्रत्येक विभाग प्रमुखाला बोलावून कामाची प्रगती व सध्य स्थितीतील त्रुटी करावयाची पुर्तता याबाबत शहनिशा करुन निर्णय घेतले जात असल्याचे अप्पासाहेब पाटील यांनी सांगितले. हे सर्व करीत असताना शेतकरी सभासद प्रतिनिधी, संचालक मंडळ व अधिकार्यांचे सहकार्य लाभत आहे. अनेकजण गेल्या आठ वर्षापासून बंद पडलेला कारखाना कायमस्वरुपी बंद पडून भंगारात जाईल अशी टिका टिप्पणी सततची व्हायची यास सिद्रामप्पा पाटील यांनी कारखान्याचे नूतनीकरण हाती घेवून सन २०२२-२०२३ सालचा गळीत हंगाम सुरु करुन त्यास चोख उत्तर दिले असल्याने तमाम शेतकरी सभासदातून समाधान व स्वागत होत आहे. यावेळी साखर कारखान्याचे मुख्य अभियंता हणमंतराव रेड्डी, व्यवस्थापकीय सचिव अशोक मुलगे, दयानंद पाटील, किरण पाटील, श्रीमंत मंगलगी, संगमेश्‍वर रेड्डी, अरविंद रेड्डी, अरविंद पाटील, युवराज पाटील, सिध्दप्पा माने, पिंटू मंगरुळे, मल्लिनाथ भासगी आदीजण प्रत्येक विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

## काळमवाडी ग्रामपंचायत निवडणुकीसाठी दाखल सर्वच अर्ज मंजूर

**सुराज्य/पिलीव :**

माळशिरस तालुक्यातील काळमवाडी ग्रामपंचायतीच्या पंचवार्षिक निवडणुकीत सरपंच पदासाठी दाखल झालेले चारही अर्ज तसेच ग्रामपंचायत सदस्य पदासाठी दाखल झालेले ३६ अर्ज छाननीत मंजुर झाले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तपासे यांनी दिली.

दोन्ही गटाकडून कोणाच्याही उमेदवारी अर्जावर कसल्याही प्रकारच्या हरकती न घेतल्यामुळे सर्व दाखल झालेले अर्ज मंजुर झाले आता ७ डिसेंबरला माघार असुन यामध्ये कोणकोणते उमेदवार माघार घेतात व कोणाकोणात लढत होणार हे चित्र स्पष्ट होणार आहे.

## चिल्लर द्या, पण पाचशेची नोट नको; व्यापाऱ्यांत भिती

**सुराज्य/कुर्डूवाडी**

बाजारात पाचशे रुपयांच्या बनावट नोटा खऱ्या असल्याचे भासवून नोटा खपवणाऱ्या कुर्डूवाडीतील दोघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी शनिवारी अटक केली होती. यामुळे शहरातील दुकानात खरेदी केल्यानंतर पाचशे रूपये नोट दिल्यानंतर नोटेकडे संशयास्पद बघत खात्री करून घेत असल्याचे दिसत आहे. तर चिल्लर द्या पण पाचशे रुपयांची नोट नको अशी मानसिकता निर्माण झाली आहे. यामुळे शहरात भिंतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



सोलापूर स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाला बनावट नोटा घेऊन येत असल्याची माहितीवरून पोलिसांनी सापळा रचून शनिवारी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास हर्षल शिवाजी लोकरे (वय २०, रा. कंदर, ता. करमाळा), सुभाष दिगंबर काळे (वय ३६, रा. भोसरे, ता. माढा) या दोघांना पोलिसांनी अटक केली होती. त्यांच्याकडून पाचशे रुपये किमतीच्या भारतीय चलनाच्या बनावट ४९३ नोटा असे एकूण २ लाख ४६ हजार ५०० रूपयांच्या नोटा जप्त करण्यात आल्या आहेत.

यापूर्वीही नागरिकांना व्यवहारात बनावट नोटा मिळाल्याची चर्चा होती. त्या नोटा फाडून टाकल्याशिवाय पर्याय नव्हता तर बँकेत पैसे भरल्यानंतर बँक अधिकारी बनावट नोट तुमच्याकडून जमा झाली आहे. ती फाडून टाका पुढील पोलीस कारवाईस सामोरे कशाला जाता. असे असे म्हणून बनावट नोट जाळल्या जात होत्या. . यामुळे बनावट नोटा खपवणाऱ्याचे चांदी होत असे. बनावट नोटा मोठ्या प्रमाणात बाजारात असल्याचा संशय व्यक्त होत आहे. नागरिकांना बनावट नोट मिळाल्यास याचा भुर्दंड त्याच नागरिकांना सहन करावा लागतो अशा बनावट नोटांची शोध मोहीम सुरू करण्याची गरज आहे.

### यापूर्वीही बनावट नोटा खपवल्याचा संशय


आरोपीकडून सापडलेल्या नोटा या आरोपींनी स्वतः छापलेल्या नसून त्यांनी बाहेरुन आणून कमिशनवर वितरित करीत होते. यापूर्वीही त्यांनी अशा प्रकारे नोटा आणून वितरित केल्या असाव्यात यामुळे शहतील व्यापाऱ्यांतुन भिंतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बॅकेतुन पैसे काढल्यानंतर पाचशे रूपयांच्या नोटा दिल्यानंतर खातेदार चिल्लर द्या पण पाचशे रूपयांची नोट नको अशी मागणी करीत आहेत. मात्र बॅक अधिकारी नोटा तपासणी मशीनमधुन नोटा तपासून देत असल्याचे सांगितल्यानंतर नोटा स्वीकारल्या जात आहेत.

## नूतन सहाय्यक विक्रीकर निरीक्षक डुचाळ हिचा साठे परिवारातर्फे सत्कार

**सुराज्य/माढा**

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तुंग यश मिळवत सहाय्यक विक्रीकर निरीक्षक पदाला गवसणी घातलेल्या उपळाई बुद्रुक च्या धनश्री डुचाळ हिचा सत्कार माढ्यातील प्रियदर्शनी महिला मंडळ व साठे परिवाराच्या वतीने करण्यात आला.

आपल्या आईवडिलांनी आपल्यासाठी घेतलेल्या कष्टाची जाणीव ठेवत जिद्द आणि चिकाटीने परिश्रम घेतल्याने यश मिळाल्याचे धनश्री डुचाळ यांनी सांगितले. यावेळी माजी आमदार ॲड धनाजीराव साठे श्री संत कुर्मदास कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे नगराध्यक्षा ॲड मिनलताई साठे उपनगराध्यक्षा कल्पनाताई साठे नगरसेविका गितांजलीताई देशमुख यांच्यासह डुचाळ कुटूंबीय आदि उपस्थित होते.



## नाभिक मंडळाच्या जिल्हाध्यक्षपदी नंदू दळवी

**सुराज्य/सोलापूर :** महाराष्ट्र नाभिक महामंडळ अंतर्गत कर्मचारी विंग महाराष्ट्र नाभिक कर्मचारी महामंडळाच्या सोलापूर जिल्हाध्यक्षपदी नंदू दळवी यांची एकमताने निवड करण्यात आली.

प्रदेश अध्यक्ष उत्तराराव सोलाने यांच्या आदेशानुसार ही निवड करण्यात आली. सोलापूर येथील शासकीय विश्रामगृहामध्ये प्रदेश उपाध्यक्ष वैभव शेटे यांच्या उपस्थितीत मिटिंग घेऊन ही निवड करण्यात आली.




## वेटलिफ्टिंग विभागीय स्पर्धेसाठी वेळापूरच्या खेळाडुंची निवड

**सुराज्य/वेळापूर :** शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज संचलित सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील विद्यालय, वेळापूर मधील विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत घवघवीत यश मिळवले आहे.

या स्पर्धेत १७ वर्ष वयोगटात ५५ किलो वजन गटात तुषार भाकरे याचा प्रथम क्रमांक आला. १७ वर्ष वयोगटात ६१ किलो वजन गटात विजयसिंह भगत याचा प्रथम क्रमांक आला. १७ वर्ष वयोगटात ६७ किलो वजन गटात अमर भाकरे याचा दुसरा क्रमांक आला. १७ वर्ष वयोगटात ८९ किलो वजन गटात संचित जवळेकर याचा प्रथम क्रमांक आला. १९वर्ष वयोगटात ६१ किलो वजन गटात तनिष दोशी याचा तृतीय क्रमांक आला. १९ वर्ष वयोगटात ६७ किलो वजन गटात अर्जुनसिंह मानेदेशमुख याचा तृतीय क्रमांक आला. १९ वर्ष वयोगटात ८१ किलो वजन गटात रोहन भानवसे प्रथम क्रमांक आला. शिवतेज माने देशमुख याचा दुतीय क्रमांक आरमान मुलाणी याचा तृतीय क्रमांक आला. विभागीय स्पर्धेसाठी प्रथम क्रमांक आलेल्या चार खेळाडूंची निवड झाली आहे. तसेच विद्यार्थिनी कुमारी तृप्ती मुंगुस्कर इयत्ता दहावी ब ४० किलो वजन गटात प्रथम क्रमांक तसेच श्रावणी खंदारे इयत्ता दहावी ब ४९ वजन गटात प्रथम क्रमांक व कुमारी अश्विनी माने इयत्ता नववी ब ५५ किलो गटात प्रथम क्रमांकाने विजयी.

या सर्व विद्यार्थांना क्रीडाशिक्षक रामचंद्र लोंढे यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्वांचे शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संस्थेचे जेष्ठ संचालक जयसिंह शंकराव मोहिते-पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह जयसिंह मोहिते-पाटील, संचालिका कु. स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील, संस्थेचे सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव खराडे, विद्यालयाचे सभापती सतीशराव माने देशमुख, विद्यालयाचे प्राचार्य अमोल फुले, शिक्षक व. शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## खो-खो क्रीडा स्पर्धेत लोकविकास विद्यालयाची निवड



**सुराज्य/वेळापूर**

वेळापुर (ता. माळशिरस) येथील लोकविकास मराठी मिडियम स्कूल वेळापूर यांनी वेळापूर येथे झालेल्या तालुकास्तरिय खो-खो स्पर्धेत १९ वर्षे वयोगटा मध्ये प्रथम क्रमांक मिळवला आहे. या खो-खो संघामधील खेळाडू अजय सावंत, यशराज भानवसे, ओम बनकर, सौरभ पिसे, अक्षय पिसे, सागर पिसे, अक्षय राऊत, शरद खिलारे, गौरव चव्हाण, लखन पिसे, महेश सोनवने, राम लोखंडे, गणेश मोटे, साहिल शेख, यांनी अतिशय चांगली कामगीरी केली. त्यांना क्रिडा शिक्षक अजित बनकर, सागर एकतपूरे, अमोल साठे, शहानवाज तांबोळी, वैभव बनसोडे, धनंजय शिवपूजे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी प्रथम क्रमांक मिळवल्याबदल माळशिरस तालुका क्रिडा अधिकारी सुप्रिया गाढवे यांनी अभिनंदन करूनजिल्हा स्तरिय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. खेळडूंच्या यशा बद्दल लोकविकास संस्थेचे संस्थापक जालिंदर बनकर, सचिव चंद्रकांत नवले, माजीउपसंरपंच मल्हारी बनकर, रमेश बनकर, मुख्याध्यापक आमोल पांढरे, सुनिल पताळे, सचिन साळुंखे आदिनी अभिनंदन केले.

सुराज्य सोलापूर
Classified
पाहिजेत
● सिक्युरिटी गार्ड पाहिजे (सात रस्ता परिसरात) वयोमर्यादा ५० आणि ड्युटी १२ तास.
संपर्क : 9822252812
7304187878
(121222)

# जगभरातील रक्तदानाचे होणार गिनीच बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड

## महापरिनिर्वाण दिनी सोलापुरात रक्तदान महाशिबिराचे आयोजन

**सुराज्य/सोलापूर**

विश्‍वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापूर संचलित रक्तपेढीमार्फत दि. ६ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी सकाळी ८ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत सोलापुरात डॉ. आंबेडकर चौकात रक्तदान महाशिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयोजक डॉ. औदुंबर मस्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.

चला रक्तदान करूया, डॉक्टर बाबासाहेबांना श्रध्दांजली वाहूया या अभियानांतर्गत संपूर्ण जगभरात लंडन अमेरिका ऑस्ट्रेलिया कॅनडा व दुबई या देशांमध्ये तसेच भारतात काश्मीर कन्याकुमारी केरळ सहित वीस राज्य व महाराष्ट्रातील १८ जिल्ह्यांमध्ये महापरिनिर्वाणदिनी एकाच दिवशी रक्तदान करून डॉक्टर आंबेडकर यांना श्रध्दांजली वाहण्यात येणार आहे त्याचाच भाग म्हणून सोलापुरात हे रक्तदान महा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे सोलापुरात डॉक्टर आंबेडकर पुतळ्याच्या पाठीमागील मैदानावर हे महा शिबिर आयोजित केले आहे या शिबिरासाठी एकूण ७५ बेडची सोय करण्यात आली असून वीस डॉक्टर्स उपलब्ध राहणार आहेत नेटके नियोजन करण्यात आला आहे रक्तदात्यांना फोटोसह प्रमाणपत्र देण्यात येणार आहे असे डॉक्टर औदुंबर मस्के यांनी यावेळी सांगितले. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे अपघातानंतर रक्तस्राव झालेले रुग्ण अनेमिया यासह विविध रुग्णांना या रक्तदानामुळे मोठा लाभ होणार आहे विविध समाजातील विविध संघटना पक्ष यांनी वेगवेगळे रक्तदान शिबिर न भरवता या अभियानात अंतर्गत जास्तीत जास्त संख्येने रक्तदान शिबिरात रक्तदान करून सहकार्य करावे, असे आवाहन डॉ. औदुंबर मस्के यांनी यावेळी केले आहे. पत्रकार परिषदेस रक्तपेढीचे प्रमुख डॉ. सुशील सोनवणे, प्रवीण सोनवणे आदी उपस्थित होते.



# रस्ते बांधणी कंपनीची नऊ कोटी रुपयांची फसवणूक

✔ सुराज्य/पुणे

**रस्ते बांधणी करणाऱ्या कंपनीतील प्रकल्प अधिकाऱ्याने नऊ कोटी आठ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी शाम अशोक निकम (रा. शिंगणापूर, अहमदनगर) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत वृजेंद्रकुमार इंद्रदेव सिंह (वय ४२, रा. एनआयबीएम रस्ता, कोंढवा) यांनी फिर्याद दिली आहे.**




वृजेंद्रकुमार सिंह यांची रोडवे सोल्यूशन 'इंडिया इन्फ्रा' कंपनी आहे. या कंपनीकडून खेड-सिन्नर, म्हसवड-पिलिव्ह, कुर्डुवाडी-पंढरपूर, सातारा-रहिमतपूर या मार्गाचे काम करण्यात आले.

२०१६ ते २०२१ या कालावधीत निकम कंपनीत प्रकल्प अधिकारी म्हणून काम करत होता.

निकम याने डिझेल, खडी, डांबर तसेच अन्य साहित्याचा अपहार करुन कंपनीची नऊ कोटी आठ लाख रुपयांची फसवणूक केल्याचे सिंह यांनी फिर्यादीत म्हटले आहे. सहायक पोलीस निरीक्षक मोहिते तपास करत आहेत.

# पुण्यात सासू-सुनेचा बिझनेस पाहून पोलिसही चक्रावले

✔ सुराज्य/पुणे

**पुण्यात गुन्ह्यांच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असताना आता आणखी एक भयंकर प्रकार समोर आला आहे. पुण्यातल्या लोणी काळभोर इथे एका सासू-सुनेवर पोलिसांनी कारवाई केली आहे. अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्या सासू-सुनेला अटक करण्यात आली आहे. लोणी काळभोर परिसरात ही कारवाई करण्यात आली. अंमली पदार्थ विरोधी पथकाने त्यांच्याकडून ४ लाख १२ हजार रुपये किंमतीचा २० किलो गांजा जप्त केला.**



लोणी काळभोर परिसरातील सोरतापवाडी परिसरात दोन महिला गांजा विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली. यानंतर पोलिसांच्या पथकाने सापळा लावला. त्यावेळी दोन महिला डोक्यावर पिशवी घेऊन निघाल्या होत्या. पोलिसांना संशय आल्याने त्यांची चौकशी करण्यात आली. त्यांच्याकडील पिशवीची पाहणी करण्यात आली. तेंव्हा पिशवीत गांजा आढळून आला. त्यांच्याकडून २० किलो ६५० ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. पोलीस उपायुक्त अमोल झेंडे, सहायक आयुक्त गजानन टोम्पे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड, सहायक निरीक्षक लक्ष्मण ढेंगळे, शैलजा जानकर, सुजित वाडेकर, मनोज साळुंके, मारुती पारधी, विशाल दळवी यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# २३ डिसेंबरपर्यंत टेंडर निघाले नाही तर सांगलीतील ४२ गावे कर्नाटकात जाणार

✔ सुराज्य/सांगली



महाराष्ट्र सरकारने सांगलीच्या जत तालुक्यातील ४२ गावांना पाणी देण्यासाठी म्हैसाळ विस्तारीत योजनेचे टेंडर २० जानेवारी ऐवजी २३ डिसेंबरच्या आत काढावे. अन्यथा २४ डिसेंबर रोजी ४२ गावांमधील दुष्काळग्रस्तांची व्यापक बैठक घेऊन पुढच्या आंदोलनाची भूमिका घेऊन कर्नाटकमध्ये जाण्याचा निर्णय घेतला जाईल, असा इशारा पाणी संघर्ष कृती समितीच्या पार पडलेल्या बंद खोलीतल्या बैठकीमध्ये घेण्यात आला आहे.

तसेच ४२ गावांना पाणी देण्यासाठी टेंडर काढायच्या सरकारच्या भूमिकेला कोणाचा विरोध नसेल, तर येत्या आठवड्यात पार पडणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये तात्काळ टेंडर काढण्याचे जाहीर करावे. जेणेकरून कोणत्या पक्षाचे पाणी देण्यासाठी विरोध आहे, हेदेखील आम्हाला समजेल. विरोध नसेल तर मग टेंडर काढायला अडचण नाही. त्यामुळे आता महाराष्ट्र सरकारने २३ तारखेपर्यंत टेंडर काढावे. अन्यथा आता २४ डिसेंबरला कर्नाटकमध्ये सामील होण्याबाबत पुढचा निर्णय आम्ही घेऊ, असा थेट इशारा पाणी संघर्ष कृती समितीकडून देण्यात आला आहे.

त्यामुळे आता शिंदे-फडणवीस सरकार काय पावले उचलणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

गेल्याच महिन्यात या गावांकडून राज्य सरकारला इशारा देण्यात आला होता. मुख्यमंत्री कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोमय्या यांनी जत तालुक्यातले ४२ गावे कर्नाटकमध्ये येणार असल्याचं विधान केल्यानंतर राज्यात एकच खळबळ उडाली. त्यानंतर स्थानिक नेत्यांपासून मुख्यमंत्र्यांपर्यंत सर्वांनी जत तालुक्यातील कोणतीच गावा कर्नाटकात जाणार नसल्याचा स्पष्ट केले होते. मात्र, प्रत्यक्षामध्ये ४२ गावातल्या पाण्यासाठी संघर्ष करणाऱ्या पाणी संघर्ष कृती समितीने वेगळी आणि आक्रमक भूमिका घेतली होती.

## हिजाब सक्ती विरोधातील संघर्षाला यश

✔ सुराज्य/इराण

मागील काही दिवसांपासून इराणमध्ये हिजाबविरोधात आंदोलन सुरु होते.

हिजाब परिधान न केल्याने इराणमधील संस्कृतीरक्षण 'पोलिसां'च्या मारहाणीत एक २२ वर्षीय तरुणीचा मृत्यू झाला होता. यानंतर घटनेनंतर इराणमधील महिला संस्कृतीरक्षक 'पोलिसां'च्या विरोधात रस्त्यावर उतरल्या होत्या.

अखेर दोन महिने सुरु असलेल्या आंदोलनानंतर इराणचे सरकार झुकले आहे. इराणमधील संस्कृतीरक्षक 'पोलीस' हे पथक बंद करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

## देवेंद्र फडणवीसांचा दावा

# एकही गाव कर्नाटकात जाणार नाही



✔ सुराज्य/मुंबई : **कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी सांगलीतील ४० गावे आमच्या राज्यात येण्यास इच्छुक असल्याचे सांगितल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली होती.**

कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी सांगलीतील ४० गावांसंदर्भात केलेला दावा फसवा असून महाराष्ट्रातील एकही गाव कर्नाटकात जाणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले होते.

जत तालुक्यातील ४० दुष्काळी गावांनी २०१२ साली कर्नाटकमध्ये सामीर होण्याचा ठराव मंजूर केला होता. हा ठराव आत्ताचा नाही, असे फडणवीस यांनी म्हटले होते. परंतु, या गावांमधील पाणी संघर्ष कृती समितीने आता नव्याने ठराव करून कर्नाटकमध्ये सामील होण्याची तयारी दाखवली आहे. त्यामुळे राज्य सरकारची डोकेदुखी वाढण्याची शक्यता आहे.



## आर्यन खानच्या निर्दोष मुक्ततेला हिंदू महासंघाकडून न्यायालयात आव्हान

✔ सुराज्य/मुंबई : अभिनेता शाहरूख खानचा पुत्र आर्यन खानच्या अंमली पदार्थ प्रकरणी झालेल्या निर्दोष मुक्ततेला हिंदू महासंघाने उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

हिंदू महासंघाचे संस्थापक आनंद दवे, ॲड. सुबोध पाठक यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. आर्यन खान घटनास्थळी रंगेहात पकडला गेला होता, तपास अधिकाऱ्यांसमोर त्याने गुन्हा मान्य केला होता, त्या आधारे न्यायालयाने दोन वेळा त्याला जामीन नाकारला होता. मात्र, न्यायालयाने आर्यन खान आणि त्याच्या सहकाऱ्यांना निर्दोष मुक्तता केले आहे.

## अश्लील चित्रीकरण; अभिनेता-दिग्दर्शकाला अटक

✔ सुराज्य/मुंबई : अश्लील चित्रीकरणाप्रकरणी चारकोप पोलिसांनी अभिनेता आणि दिग्दर्शक अनिरुद्ध झगडे याला शनिवारी अटक केली. न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. या गुन्ह्यांत इतर तिघांचा सहभाग उघडकीस आला असून त्यात यास्मिन खान, अमीत पासवान आणि आदित्य यांचा समावेश आहे.

तक्रारदार तरुणी मॉडेल असून तिने आतापर्यंत अनेक नामांकित कंपनीच्या जाहिरातीत काम केले आहे. तिला मॉडलिंग क्षेत्रासह हिंदी चित्रपटसृष्टीत काम करायचे होते. त्यासाठी तिचे प्रयत्न सुरु होते.

# देशात लागू होणार नवी श्रम संहिता

✔ सुराज्य/नवी दिल्ली

देशातील कामगार आणि कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी आली आहे. केंद्र सरकारकडून नवीन श्रम संहिता लागू करण्यात येणार आहे. या नव्या संहितेमुळे कामगार आणि कर्मचाऱ्यांना आता अधिक फायदा होणार आहे. नवीन श्रम संहितेचा एक भाग असलेला सामाजिक सुरक्षा कायदादेखील संमत करण्यात आला असून या सामाजिक सुरक्षा कायद्यामुळे संघटीत आणि असंघटीत क्षेत्रातील कामगारांना मोठा फायदा होणार आहे.

भारतातील बहुतांशी राज्यांनी यावर सहमती दर्शवली आहे. नवीन श्रम कायद्याची अंमलबजावणी सुरू करण्यात येणार आहे. या नव्या कायद्यात कर्मचारी, कामगारांना सामाजिक सुरक्षा, लैंगिक समानता, कल्याणकारी योजनांचा फायदा होणार आहे. भारत सरकारने कामगार क्षेत्राला किमान वेतन आणि सामाजिक सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी चार श्रम संहिता पारित केल्या आहेत. या नव्या संहितेत या तीन मुद्यांवर भर देण्यात आलेला आहे. यात कायमस्वरूपी कामगार आणि कर्मचाऱ्यांप्रमाणेच कंत्राटी कामगार आणि कर्मचाऱ्यांनाही फायदा होणार आहे. या नव्या संहितेनुसार कामगार आणि कर्मचाऱ्यांना सामाजिक सुरक्षाही मिळणार आहे. तसेच या संहितेत लैंगिक समानता पाळली जाणार आहे. महिलांसाठी कामाच्या ठिकाणी अधिक सुरक्षित आणि उत्तम वातावरण निर्माण करण्यावर भर देण्यात आला आहे.

**कर्मचाऱ्यांसाठी कल्याणकारी योजना**

✻ 'कर्मचारी-कामगार' या शब्दाच्या व्याख्येत असंघटीत क्षेत्रातील कामगारांचा समावेश. ✻ कर्मचारी, कामगारांना मिळणार भविष्य निर्वाह निधी, ग्रॅज्यूएटीचे फायदे. ✻ लहान उद्योग, कंपन्या राज्य कामगार विमा योजनेत ईएसआय येणार. ✻ जोखीम असलेल्या उद्योगांनादेखील ईएसआयमध्ये होणार समावेश.

## नायजेरियात मशिदीवर अंदाधुंद गोळीबार; १२ जणांचा मृत्यू

✔ सुराज्य/नायजेरिया : नायजेरियाच्या कट्सिना राज्यातील मैगामजी गावातील एक मशिदीवर गोळीबार करण्यात आला असून या गोळीबारात १२ जणांचा मृत्यू झाला आहे. तर दोघे गंभीर जखमी झाले आहेत.

हल्लेखोरांनी बंदुकीचा धाक दाखवून १९ जणांचे अपहरण केले आहे. शनिवारी (३ डिसेंबर) संध्याकाळच्या सुमारास ही घटना घडली. दिलेल्या वृत्तानुसार, मशिदीमध्ये नमाज अदा करण्यासाठी नागरिक जमले होते. त्यावेळी हल्लेखोरांनी मशिदीत प्रवेश करत अंदाधुंद गोळीबार सुरू केला.

## महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद

# मंत्र्यांचा बेळगाव दौरा तूर्त रद्द

## मुख्यमंत्री शिंदे अमित शहांना भेटणार



✔ सुराज्य/मुंबई

**कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील गावांचा कर्नाटकात समावेश करण्याची तयारी दर्शवली होती.**

मुख्यमंत्री बोम्मई यांच्या वक्तव्य महाराष्ट्र कर्नाटकमधील सीमावाद पुन्हा तापला. यानंतरही कर्नाटक सरकारकडून महाराष्ट्रातील सीमाभागातील गावांना पाणी सोडण्यात आल्याने आणि आक्रमक वक्तव्य करण्यात आल्याने तणावात भर पडली. या पार्श्वभूमीवर राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील आणि शंभुराज देसाई हे उद्या सीमा भागात जाऊन मराठी बांधवांची भेट घेणार होते. पण आता त्यांचा हा दौरा तूर्त रद्द करण्यात आला असून तो लांबवणीवर टाकण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. दोन्ही राज्यांमध्ये भाजपचेच सरकार असल्याने राज्यातील नेतृत्वाकडून टोकाची भूमिका घेतली जात नसल्याचे चित्र आहे.

महाराष्ट्र-कर्नाटकमधील सीमावाद वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सोमवारी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहांची भेट घेणार आहेत. मुख्यमंत्री शिंदे हे सीमावादावर अमित शहांशी चर्चा करणार असल्याचे सांगण्यात येत आहे. यासोबतच सीमावाद चिघळू नये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणून मंत्र्यांना तूर्त दौऱ्यावर न जाण्याच्या सूचना दिल्याचे सांगण्यात येत आहे. सीमाभागातील पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन मुख्यमंत्री शिंदे हे पुढील रणनीती आखणार असल्याचे सूत्रांनी म्हटले आहे.

# समान नागरी कायदा; कोणाला फरक पडू शकतो?

✔ सुराज्य/मुंबई

**समान नागरी कायद्याबाबत योग्य वेळी बोलू, असे सूचक वक्तव्य उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच केले. त्यामुळे पुन्हा एकदा या कायद्याविषयी चर्चा सुरु झाली. मात्र, या कायद्याविषयी अजूनही पूर्ण स्पष्टता ना केंद्र सरकारने दिली ना राज्य सरकारने दिली आहे. त्यामुळे तूर्त तरी स्पष्टता नसलेला हा कायदा समानता आणेल का?, असा प्रश्न उपस्थितीत झाला आहे.**

२०१९ च्या निवडणुकीत भाजपने हा कायदा आणणार असल्याची घोषणा केली होती. तसे आश्वासनच भाजपने दिले होते. अधूनमधून त्याची आठवण करून दिले जाते. मुळात या कायद्याची पायेमुळे राज्य घटनेतच रोवलेली आहेत. राज्य घटनेचे अनुच्छेद ४४ मध्ये तशी तरतूद करण्यात आली आहे. देशातील सर्व नागरिकांना एक समान ठेवणारा कायदा असावा, असे यामध्ये नमूद करण्यात आले आहे.

विवाह, संपत्ती, वारसा हक्क, दत्तक अधिकार यामध्ये एक समानता असायला हवी, असा हा कायदा असावा, असे विश्लेषण राज्य घटनेचे अनुच्छेद ४४मध्ये करण्यात आले आहे. राज्य सरकारलाही असा कायदा करण्याचा अधिकार आहे. तशीही तरतूद करण्यात आली आहे. विवाह, संपत्ती, वारसा हक्क, दत्तक अधिकार याला नियमन करणारे कायदे आपल्याकडे आहेत. जे संपूर्ण देशात एक समान आहेत. मुस्लीम समाजात केवळ



विवाह संदर्भातील कायदा स्वतंत्र आहे. पण त्यांच्या विवाह विषयक रुढी परंपरांत सुधारणा करणारे अनेक निर्णय उच्च व सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. जसं की मुस्लीम समाजात चार विवाहांना मान्यता आहे. मात्र या मान्यतेवर न्यायालयाने निर्बंध आणले आहेत. पहिल्या पत्नीची संमती असेल व मौलानाची परवानगी असेल तरच तुम्ही अन्य विवाह करु शकता, असे न्यायालयाने सांगितले आहे. त्यामुळे समान नागरी कायद्यातील विवाहाविषय निर्बंधांचा तसा फरक पडणार नाही, असे तूर्त तरी दिसते आहे.

मात्र राजकीय स्वार्थ व विशिष्ट समाजाबाबत द्वेष ठेवून हा कायदा आणायचा झाल्यास अनेक जाचक अटींचा त्यात समावेश होऊ शकतो. त्यामुळे तसे न करता सर्वसमावेशक अशी कायद्याची मांडणी असायला हवी, असे ॲड. असिम सरोदे यांनी सांगितले.

मुळात आपल्याकडे कितपत स्त्री-पुरुष समानता आहे. शरद पवार यांनी मुख्यमंत्री असताना स्त्रीला संपत्तीत हक्क देणारा कायदा केला. अशाप्रकारे समानतेचे कायदे होणे अपेक्षित आहे, असेही ॲड. सरोदे यांनी सांगितले.

भारत स्वातंत्र्य झाला व आपण कायदे करण्याची प्रक्रिया सुरू केली तेंव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू कोड बील मांडले व हिंदू स्त्रियांना वाडवडिलांच्या संपत्तीत समान अधिकार देणारा कायदा मांडला. तेंव्हा हिंदुत्ववादी नेत्यांनी त्या कायद्याला विरोध केला होता. स्त्री-पुरुष समानता त्यांना नको आहे पण, आता समान नागरी कायदा आणायचा आहे. यामागे असमानता हटवणे हा उद्देश नसेल व धार्मिक रूढी-परंपरांच्या आधारे मतभेद आणि कलह निर्माण करायचे असतील तर हे राजकारण नागरिकांनी ओळखले पाहिजे, असे ॲड. सरोदे यांनी सांगितले.

राज्य सरकरलाही आपल्या राज्यात समान नागरी कायदा आणता येतो. ज्या राजकीय पक्षांची अनेक वर्षे गुजरात, राजस्थान येथे एकहाती सत्ता आहे त्यांनी तेंव्हा का नाही समान नागरी कायदा आणण्यासाठी प्रयत्न केले? हा प्रश्न तर पडलाच पाहिजे, असा मुद्दाही ॲड. सरोदे यांनी उपस्थितीत केला.

मध्यप्रदेश सरकारने हा कायदा लागू करण्यासाठी तज्ज्ञांची समिती स्थापन केली आहे. तसेच उपमुख्यमंत्री फडणवीस यांनीही याविषयी सूचक वक्तव्य केले आहे. मात्र, कायद्याच्या चौकटीत न बसणारा कायदा केला तर त्याचीही न्यायालयीन लढाई सुरु होईल. मराठा आरक्षण, सर्वोच्च न्यायालयाने रद्द केले. समलिंगी विवाहाचा मुद्दा आजही अधांतरीतच आहे.

# 'अजून तरी राजसाहेब मला प्रिय आहेत'

## वसंत मोरे यांचे सूचक संकेत

✔ सुराज्य/मुंबई

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पुण्यातील नेते वसंत मोरे यांनी विरोधी पक्षनेते अजित पवार यांची भेट घेतल्यानंतर आता राजकीय वर्तुळात तर्कवितर्कांना उधाण आले आहे. या पार्श्वभूमीवर सोमवारी पुण्यात प्रसारमाध्यमांशी बोलताना वसंत मोरे यांनी काही सूचक संकेत दिले आहेत. अजित पवार यांनी आपल्याला राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये येण्याची ऑफर



दिल्याची बाब त्यांनी मान्य केली. मी सध्या मनसेतच आहे. पण अलीकडे मला पक्षसंघटनेतील लोकांकडून त्रास देण्याचा प्रकार सुरु असल्याचेही वसंत मोरे यांनी सांगितले. त्यामुळे वसंत मोरे भविष्यात मनसेला सोडचिठ्ठी देऊन राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दाखल होणार का, अशी जोरदार चर्चा सुरु झाली आहे.

वसंत मोरे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना पुण्यातील लग्न समारंभात घडलेला प्रसंग कथन केला. मी लग्नात स्टेजवरून खाली उतरलो आणि रुपाली चाकणकर यांच्याशी बोलत उभा होतो. त्यावेळी दूरवर असलेल्या अजितदादांशी माझी नजरानजर झाली. यानंतर आम्ही दोघेही गर्दीतून वाट काढत एकमेकांपाशी गेलो. तेव्हा दादा म्हणाले की, अजून किती दिवस नाराज. या आम्ही वाट बघतोय. त्याच्यानंतर जातानाही अजित पवार म्हणाले की, वसंतराव मला तुम्हांला भेटायचे आहे. तुम्ही या असे वसंत मोरे यांनी सांगितले.

# कर्नाटकाचा झेंडा फडकावल्याने उडगीत १७ जणांवर कारवाई

✔ **सुराज्य/अक्कलकोट** : उडगी (ता. अक्कलकोट) येथे सीमावाद प्रश्नावर कर्नाटक राज्याचे झेंडा फडकावणे, जयघोष करणे. एकंदरीत वातावरण बिघडवल्याप्रकरणी तब्बल १७ जणावर दक्षिण पोलीस ठाण्याचे पोलिसांनी कारवाई केली आहे. यामुळे आंदोलन कर्त्यामध्ये एकच खळबळ उडाली आहे.

उडगी येथे दि. २ डिसेंबर रोजी उमेश कोळी, रमेश भांड, अप्पाशा कुंभार, सिध्दाराम पुजारी, शरणू कोळी, श्रीकांत कोळी, कलप्पा मामा, सुरेश माड्याळ, धुळप्पा जिगजांबगी, सोमु आलूरे, विशाल पॅटी, सुरेश हडपद, शरणप्पा कुंभार, देवेंद्र नारायणकर, सुभाष भांड, अनविरप्पा स्वामी, नागणा म्हेत्रे यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. सदरची कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ राजेंद्रसिह गौर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रदीप काळे, त्यांचे पोलीस कर्मचारी यांनी केली आहे. तडवळ भागातील वातावरण शांत होत नाही, तोपर्यंत उडगी येथे शेकडो लोकांना एकत्रित करून जयघोष करणारे कोण, यांना भडकवणारे कोण आहेत. याचा पोलिसांनी शोध घेणे आवश्यक आहे.

# सार्वजनिक स्वच्छतागृहांअभावी महिलांची होतेय कुचंबणा

## महापालिकेवर महिलाराज असूनही महिलावर्गाची उपेक्षा

**सुराज्य/सोलापूर**

स्मार्ट सिटी असलेल्या सोलापुरात महिलांसाठी मोफत स्वच्छतागृहांची वानवा आहे. या सुविधेअभावी महिलांची कुंचबणा होत आहे. शहरात गत अनेक वर्षांपासून महापौरपदावर महिलांना काम करण्याची सलग संधी मिळत आहे. शिवाय ५० टक्के महिला नगरसेविका असल्याने महापालिकेवर महिलाराज आहे. आजवर अनेक महापौरांनी महिला स्वच्छतागृहांचा प्रश्न सोडविण्याचा संकल्प बोलून दाखविला, मात्र तो सिध्दीस नेला नाही. आता पहिल्या महिला आयुक्तांनी यावर ठोस निर्णय घेण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

एकेकाळी शहराच्या प्रत्येक भागात महापालिकेची मोफत स्वच्छतागृहे (मुतारी) होती. पण त्यांची निगा व्यवस्थित राखली जात नसल्याने ती आसपासच्या लोकांची डोकेदुखी ठरली. अशी अनेक स्वचछतागृहे बेकायदेशीरपणे पाडून टाकली आहेत. एवढेच नव्हे अनेक स्वच्छतागृहे, शौचालये वापरात नाहीत असे दाखवून मनपा सभेत ठराव करून ती पाडण्यात आली आहेत. पाडलेल्या ठिकाणी अतिक्रमण झाल्याचे धक्कादायक प्रकार घडले आहेत.

शहरात नवी पेठ, मधला मारुती, सराफ गल्ली, चाटी गल्ली, भुसार गल्ली, मंगळवार बाजार, लक्ष्मी मंडई, बुधवार बाजार, विजापूर रोड, अशोक चौक, ७० फूट रोड, नीलमनगर आदी भागांमध्ये व्यापारपेठा आहेत. शिवाय अनेक ठिकाणी मंडईदेखील आहेत. अशा ठिकाणी शहरवासीयांबरोबरच ग्रामीण भागातून महिला वर्ग खरेदी व अन्य कामांसाठी येत असतात, पण त्यांच्यासाठी स्वच्छतागृहांची सोय नसल्याने त्यांची कुंचबणा होत आहे.




### एकूण ३१५ ठिकाणी शौचालये

शहरात एकूण ३१५ ठिकाणी शौचालये असून त्यातील एकूण शीटस्ची संख्या चार हजार ७६७ आहे. यामध्ये पुरूषांसाठी दोन हजार ३८० तर स्त्रियांसाठी दोन हजार ३८७ शीटस् आहेत. ई-टॉयलेटस्ची संख्या ३० इतकी असून सुलभ शौचालयांची संख्या २२ इतकी आहे.

### ई-टॉयलेटचा वापर नाही

स्मार्ट सिटी योजनेंतर्गत शहरात विविध ३० ठिकाणी ई-टॉयलेटची सोय करण्यात आली आहे. यापैकी ३० शीट पुरूषांसाठी तर ३० शीट स्त्रियांसाठी आहेत. ही सेवा सशुल्क आहे, मात्र त्याचा प्रभावीपणे वापर होत नाही. क्वॉईन टाकून या सेवेचा लाभ घेण्याबाबत अज्ञान असल्याने अशिक्षित लोक याठिकाणी जायचे टाळतात तर सुशिक्षित लोकदेखील कमी प्रमाणात त्याचा वापर करीत असल्याचे दिसून येते. एकंदर शहरात सार्वजनिक स्वच्छतागृहांअभावी महिलावर्गाचे हाल होत आहेत. महिला महापौरांच्या कालावधीत हा प्रश्न सुटला नाही. आता पहिल्या महापालिका आयुक्तांच्या कारकिर्दीत तरी हा प्रश्न मार्गी लागेल, अशी महिलावर्गाला आशा आहे.

### बंद पडलेल्या बसेसचा उपयोग स्वच्छतागृहांसाठी करू

परिवहनच्या बंद पडलेल्या बसेसचा उपयोग स्वच्छतागृहांसाठी करण्याचा विचार आहे. याकरिता सीएसआर' फंडाची गरज आहे. यातून निधी उपलब्ध झाल्यास स्वच्छतागृहांचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे, असे आयुक्त शितल तेली उगले यांनी म्हटले आहे.



महापरिनिर्वाण दिनेच्या पूर्वसंध्येला पी.बी. ग्रुपच्यावतीने पार्क चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरात मेणबत्त्या लावून अभिवादन करण्यात आले.

## दत्ता शिंदे यांच्या राष्ट्रवादी प्रवेशाच्या चर्चेने कार्यकर्त्यांमध्ये उत्साह

**सुराज्य/अक्कलकोट**

धोत्री येथील गोकुळ शुगरचे चेअरमन दत्ता शिंदे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षप्रवेश निश्चित झाल्याने तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांत उत्साहा संचारला आहे. तर दत्ता शिंदे यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष प्रवेशामुळे तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद वाढणार असल्याचे बोलले जात आहे.



गेल्या अनेक वर्षांपासून अक्कलकोट तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसचा म्हणावा तसा विस्तार होताना दिसून आला नाही. यामुळेच तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद ही मर्यादीतच राहिली गेली आहे. आता गोकुळ शुगर इंडस्ट्रीजचे चेअरमन दत्ता शिंदे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष प्रवेश निश्चित मानला जात आह. शिंदे यांच्या प्रभावी नेतृत्वामुळे तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ताकद वाढणार आहे. दत्ता शिंदे यांच्या नेतृत्वामुळे सध्या गोकुळ कारखाना प्रगतीपथावर असल्याचे पहायला मिळत आहे. वर्षातच गोकुळ शुगर कारखाना आर्थिक संकटातून मुक्त झाला आहे. सध्या दत्ता शिंदे यांनी उस उत्पादक शेतकर्यांना योग्य दर देऊन न्याय देण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

यामुळेच तालुक्यात सामान्य नागरिक व उस उत्पादक शेतकर्यांचा गोकुळ शुगरला प्रतिसाद वाढताना दिसून येत आहे. भगवानराव शिंदे यांच्या निधनानंतर अभ्यासू वृत्तीने कमी कालावधीतच पुन्हा एखदा गोकुळ शुगरला दत्ता शिंदे यांनी गतवैभव प्राप्त करुन दिले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते अजित पवार यांनी तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची जबाबदारी दत्ता शिंदे यांच्याकडे देण्याचे निश्चित केल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साहा संचारला आहे. सध्या शिंदे परिवारातील बलभीम भाऊ शिंदे व दिवंगत भगवानराव शिंदे यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी तालुक्यात दत्ता शिंदे, कपिल शिंदे आणि विशाल शिंदे हे तिघे प्रयत्नांची पराकाष्ठा करताना दिसतात. अजित पवार यांनी दत्ता शिंदे यांच्या रुपाने नवा चेहरा जनतेसमोर आणून तालुक्यात काँग्रेस व भाजपा समोर एक नवा पर्याय उभा करण्याचा प्रयत्न केला आहे.

### लवकरच प्रवेश होण्याची शक्यता

सध्या तालुक्यात दत्ता शिंदे यांच्या पक्ष प्रवेशाची जोरदार तयारी सुरु आहे. आता काही दिवसांतच दत्ता शिंदे यांचा होणार असल्याचे बोलले जात आहे. नुकताच दत्ता शिंदे यांनी मुंबईत अजित पवार यांची भेट घेतली होती. या वेळी अक्कलकोट तालुक्याच्या आगामी राजकारणावर सविस्तर चर्चा झाली. याच भेटी दरम्यान चेअरमन दत्ता शिंदे यांनी तालुक्यातील विकास कामासंदर्भात अजित पवार यांना एक निवेदन ही सादर केले होते. यावेळी अजित पवार यांनी दत्ता शिंदे यांना कामाला लागण्याची सूचना केली होती.

## सहाव्या मजल्यावरून कोसळून वृध्दाचा मृत्यू

**सुराज्य/सोलापूर** : सहाव्या मजल्यावरील घराच्या गॅलरीत पाणी मारत असताना पाय घसरून खाली कोसळल्याने ७६ वर्षाचे वृध्द गंभीर जखमी होऊन मरण पावले. ही घटना विजापूर रोडवरील आयएमपी ग्रीन सोसायटी येथे रविवारी रात्रीच्या सुमारास घडली. महादेव शंकर बुऱ्हाणपूर (वय ७६ रा. आयएमपी ग्रीन सोसायटी) असे मयत झालेल्या वृध्दाचे नाव आहे. रविवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास ते गॅलरीत पाणी मारत होते. त्यावेळी पाय घसरून सहाव्या मजल्यावरून वरून खाली कोसळल्याने गंभीर जखमी झाले होते. सुरज बुऱ्हाणपूर (मुलगा) यांनी त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ते उपचारापूर्वीच मयत झाले.

## आजारास कंटाळून विष प्राशन

**सुराज्य/सोलापूर** : मार्डी (ता. उत्तर सोलापूर) येथे राहणाऱ्या लिला बालाजी पवार (वय २३) हिने विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केली. ही घटना सोमवारी पहाटेच्या सुमारास घडली. तिला उपचारासाठी शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोट दुखीच्या आजारास कंटाळून तिने हा प्रकार केला.

## पंढरपूर येथे आत्महत्येचा प्रयत्न

**सुराज्य/सोलापूर** : पंढरपूर येथील आंबेडकर नगरात राहणाऱ्या गणेश शंकर क्षीरसागर(वय२५) याने घरगुती वादातून ब्लेडने गळ्यावर आणि हातावर वार करून घेऊन गंभीर जखमी झाला. ही घटना सोमवारी सकाळच्या सुमारास घडली. त्याला पंढरपूर येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## अपघातामधील जखमी तरुणाचा मृत्यू

**सुराज्य/सोलापूर** : पुणे महामार्गावरील वरवंड टोल नाका येथे दुचाकीच्या अपघात जखमी झालेला करण एकनाथ कोळी (वय २६ रा. उमरगा जि. उस्मानाबाद) हा सोलापुरातील शासकिय रुग्णालयात उपचार घेताना सोमवारी दुपारी मरण पावला. तो २ डिसेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास पुणे ते उमरगा असे दुचाकीवरून निघाला होता. वरवंड जवळ अनोळखी वाहनाच्या धडकेने तो जखमी झाला होता. त्याला टेंभुर्णी येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरात दाखल करण्यात आले होते. अशी नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## शरद नागरी बँकेतर्फे शरद सप्ताहाचे आयोजन

**सुराज्य/सोलापूर** : राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून यंदाही शरद नागरी सहकारी बँकेने १२ डिसेंबर रोजी सहा गटात चित्रकला स्पर्धा आयोजित केली आहे, अशी माहिती संयोजक संस्थापक माजी महापौर मनोहर सपाटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शरद नागरी बँकेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त शरद सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाचे वैशिष्ट्य म्हणजे चित्रकला स्पर्धेवेळी स्वतः शरद पवार हे थेट ऑनलाईन चित्रकला स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. शरद बँकेच्या वतीने चित्रकला स्पर्धा बरोबरच होम मिनिस्टर, रक्तदान, रांगोळी, मेहंदी अशा स्पर्धाही शहरात ठीक ठिकाणी होणार आहेत. येत्या १० डिसेंबर ते २६ डिसेंबर पर्यंत हे कार्यक्रम होणार आहेत. शरद सहकारी बँक यंदाही नफ्यात असून ६८. २० इतका नफा झाला आहे. या बँकेला ऑडिटरचा अ दर्जा कायम प्राप्त आहे, असेही सपाटे यांनी यावेळी सांगितले. पत्रकार परिषदेस बँकेचे चेअरमन महेश माने, सांस्कृतिक समितीचे ज्ञानेश्वर सपाटे, अधिकारी राजेंद्र अवताडे, बँकेचे संचालक शिक्षक आणि अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

## मान्यवरांच्या उपस्थितीत कोठे-राजूल विवाह सोहळा



**सुराज्य/सोलापूर**

ज्येष्ठ नेते स्वर्गीय विष्णुपंत तात्यासाहेब कोठे यांचे नातू व माजी महापौर महेश आण्णा कोठे यांचे चिरंजीव नगरसेवक प्रथमेश कोठे व अंबादास राजुल यांची सुकन्या श्रुतिका यांचा शुभविवाह रविवार ४ डिसेंबर २०२२ रोजी दुपारी राज मेमोरियल इंग्लिश स्कूल जुना विडी घरकुल हैदराबाद रोड येथे मोठ्या थाटात संपन्न झाला.

या विवाहप्रसंगी वधू-वरांना शुभाशीर्वाद देण्यासाठी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे ज्येष्ठ नेत्या उज्वलाताई शिंदे, ज्येष्ठ सरकारी वकिल ॲडव्होकेट उज्वलजी निकम, माजी दुग्ध विकास मंत्री् मधुकरराव चव्हाण आ. प्रणिती शिंदे, माजी सहकार मंत्री तथा विद्यमान आ. सुभाष देशमुख, सोलापूरचे माजी पालकमंत्री दत्ता भरणे, विजयकुमार देशमुख, मोहोळचे आ. यशवंत माने, दै. सुराज्ये संपादक राकेश टोळ्ये, मा. आ. धनाजी साठे, दीपक साळुंखे-पाटील, मा. आ. विश्वनाथ चाकोते, धर्मराज काडादी, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बळीराम साठे, शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शदे, शहाजी पवार, इंद्रजीत पवार, संतोष पवार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष भारत जाधव, नगरसेवक गणेश वानकर, मोहोळचे नगराध्यक्ष रमेश बारस्कर, मानाजी बापू माने, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ता उमेश पाटील, पद्मशाली समाजाचे ज्येष्ठ नेते सत्यनारायण बोल्ली, माजी महापौर नलिनी चंदेले, माजी महापौर कांचना यन्नम, माजी महापौर मनोहरपंत सपाटे आरिफ शेख, मकबूल मोहोळकर, उपमहापौर दिलीप कोल्हे, पद्माकर काळे, महेश गादेकर, अशोक मुळीक, नगरसेवक मनोज, शेजवाळ, चेतन नरोटे, विनोद भोसले, आनंद चंदनशिवे, प्रवीण निकाळजे, विनायक कोंड्याल, तौफिक शेख शशिकांत कैंची, दीपक राजगे नगरसेविका श्रीदेवी फुलारे, जॉन फुलारे शिवसेना जिल्हाप्रमुख मनीष काळजे, फारूक शाब्दी, संतोष वाकसे, नगरसेवक सुभाष डांगे, भीमाशंकर म्हेत्रे, शैलेश अमनगी गुरुशांत धुत्तरगावकर, उमेश गायकवाड, जगदीश पाटील, सुरेश पाटील, माजी स्थायी समिती सभापती शिवलिंग कांबळे, केदारनाथ उंबरजे, सिद्राम अटेलूर, महादेव चाकोते, सिद्राम चाकोते, पद्मशाली ज्ञाती संस्थेचे माजी अध्यक्ष रामकृष्ण कोंड्याल, सुदीप चाकोते बिजू प्रधाने, पद्मशाली ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी जीएम मागासवर्गीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब वाघमारे, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सोमनाथ राऊत, मंगळवेढ्याचे अविनाश शिंदे, सोलापूरच्या माजी जिल्हा पोलीस अधीक्षक वैशाली कडूकर, अडव्होकेट विजय मराठे, उमेश मराठे, ॲडव्होकेट, श्रीनिवास कटकुर, ब्रिजमोहन पोफलिया, दशरथ कसबे, विद्याताई लोलगे, नगरसेविका लताताई फुटाणे, भारती इप्पलपल्ली, अन्नछत्र मंडळाचे विश्वस्त अमोल राजे भोसले, यांच्यासह हजारो लोकांची उपस्थिती होती.

## शेळगीच्या गौडगाव मठात नंदीध्वज पूजनाचा सोहळा

**सुराज्य/सोलापूर** : खा. डॉ. जयसिध्देश्वर महास्वामी यांच्या शेळगीतील गौडगाव मठात सोमवारी नंदीध्वज पूजनाचा सोहळा भक्तीभावाने पार पडला. श्री सिध्दरामेश्वर यांच्या जयजयकाराने वातावरण भारावून गेले होते. याप्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर व भक्तगण उपस्थित होते.



ग्रामदैवत श्री सिध्देश्वर यात्रा जवळ येत आहे. त्याअनुषंगाने शहरात नंदीध्वज सराव सुरू आहे. सोमवारचे औचित्य साधून या मठात मानाच्या चौथ्या काठीचे पूजन आयोजित करण्यात आले होते. दुपारी साडेबारा वाजता काठीचे मठात आगमन झाले. त्यानंतर महास्वामींच्या हस्ते विधीवत या नंदीध्वजाची पूजा पार पडली. अन्य धार्मिक विधी राजू हत्ती व सौ. हत्ती यांच्या हस्ते पार पडले. विजयकुमार स्वामी व चंदय्या स्वामी यांनी पौरोहित्य केले. त्यानंतर भक्तांना महाप्रसाद देण्यात आला. याप्रसंगी आमदार सुभाष देशमुख, जयहिंद शुगरचे चेअरमन बब्रूवान माने, वळसंग सूत गिरणीचे चेअरमन राजशेखर शिवदारे, सागर सिमेंटचे महादेव कोगनूर, प्रकाश वाले, अमर पाटील, सुरेश हत्ती, रूद्रमुनी हिरेमठ, देवेंद्र वानखेडे, श्रीकांत माळगे यांच्यासह नंदीध्वज सरावाचे सेवेकरी संतोषकुमार शिरसी, संगमेश्वर नीला, जगदीश आडके, गजानन दामा, धनराज खुबा, ओंकार कुदरे, श्रवण नवले उपस्थित होते.

## शहराचा विस्कळीत पाणीपुरवठा सुरळीत करा

### आ. शिंदे यांची आयुक्तांकडे मागणी

**सुराज्य/सोलापूर**

पालिका आयुक्त शितल तेली उगले यांनी सोलापूर महानगरपालिकेचा पदभार स्वीकारल्यानंतर आमदार प्रणिती शिंदे यांनी सोमवारी पालिका आयुक्तांशी भेट घेऊन विविध विषयावर चर्चा केली. खास करून शहरातील विस्कळीत पाणीपुरवठा त्वरित सुरळीत करावा, अशी मागणी त्यांनी यावेळी प्रामुख्याने केली.

शहरात अनेक दिवसापासून रस्त्याची कामे रखडली आहे, स्मार्ट सिटीच्या माध्यमातून होत असलेल्या कामाला गती द्यावी, चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रकरणाचा निपरा करावा तसेच अक्कलकोट एमआयडीसी येथील भागात नागरी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात आणि शहरातील विस्कळीत पाणीपुरवठा त्वरित सुरळीत करावा आदी मागण्या आपण केल्या आहेत, प्रशासकीय बैठक आयोजित केली होती. बैठकीमध्ये नागरिकांच्या व कर्मचाऱ्यांच्या समस्या बाबत सकारात्मक चर्चा झाली. यांमध्ये पालिके मधील बदली रोजंदारी कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याबाबतचा सुधारित प्रस्ताव शासनाकडे पाठवून देण्याची



कार्यवाही ताबडतोब करावी, फाई कर्मचाऱ्यांना दोन वसाहत मिळावी, सहा एकर जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य योजनास उपलब्ध करून द्यावी, घंटागाडी कर्मचाऱ्यांना शासना निर्देशा नुसार किमान वेतन मिळावे, लाड पागे समिती वारसदारांना एक महिन्याच्या नियुक्ती मिळाव्यात असे. आ. शिंदे म्हणाल्या. यावेळी गटनेते चेतन नरोटे, माजी सभागृह नेते संजय हेमगड्डी, नगरसेवक बाबा मिस्त्री संजय हेमगंडी कामगार नेते सदाफुले आदींसह पालिकेचे अधिकारी उपस्थित होते.

## नाट्यमय घडमोडीनंतर भाजपाचे उमेदवार बोरगे यांचा अर्ज मंजूर

**सुराज्य/सोलापूर**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील निंबर्गी ग्रामपंचायतीचे सरपंचपदाच्या अर्ज छाननी दरम्यान भाजपाचे उमेदवार चन्नप्पा बोरगे यांचा अर्ज मंजूर करण्यात आला. यावेळी संपूर्ण दिवसभर नाट्यमय घडमोडी घडल्या. त्यामुळे आगामी काळात होणाऱ्या निवडणुकित येथे चांगलीच चुरस होणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

काँग्रेस पक्षाचे जिल्हा कार्यकारी अध्यक्ष सुरेश हसापुरे यांचे चिरंजीव श्रीदीप हसापुरे हे निंबर्गीतून सरपंच पदाच्या निवडणुकित उमेदवार आहेत. त्यांच्या विरोधात आ. सुभाष देशमुख गटाचे चन्नप्पा बोरगी हे उमेदवार आहे. हसापुरे-बिराजदार-पाटील गटाच्या बसवराज माशाळे यांनी चन्नप्पा बोरगी यांच्या अर्जावर हरकत घेतली होती. चन्नप्पा बोरगी हे स्वतः जेसीबी लावून कॉन्ट्रॅक्टरचे काम करत होते. त्यांनी ९ हजार व ५ हजारचे चेक स्वतःच्या नावाने उचलले आहेत २०१३-१४ ते पुढील १० वर्ष मी ग्रामपंचायत ठेकेदार काम करण्यास तयार आहे म्हणून त्यांनी करारनामा करून दिला असे असताना नामनिर्देशन पत्रात मी ठेकेदार नाही म्हणून माहिती दिली, स्वघोषणा पत्र केले आणि शासनाची माहिती लपवली, अशी हरकत माशाळे यांनी घेतली होती.

ही माहिती जेव्हा आमदार सुभाष देशमुख यांना देण्यात आली. तेव्हा आपला सरपंच पदाचा उमेदवार बाद होऊ नये याची काळजी आ. देशमुख यांनी घेतल्याची माहिती कार्यकर्त्याकडून मिळाली. त्यावेळी आ. देशमुख यांनी आपली यंत्रणा वापरल्याचे बोलले जात आहे.

सकाळी ११ वाजता सुरू झालेली अर्ज छाननी प्रक्रिया दुपारी २ वाजता सुनावणी होऊन पूर्ण झाली. रात्री सात वाजेपर्यंत निकाल देण्यात आला नव्हता. त्यामुळे दोन्ही गटातील कार्यकर्ते त्याठिकाणी ठाण मांडून होते. निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले होते. अखेर रात्री सात नंतर माशाळे याची हरकत फेटाळून चन्नप्पा बोरगे यांचा अर्ज मंजूर करण्यात आला. त्यामुळे शेवटी सुभाष देशमुख यांनी यात बाजी मारल्याचे दिसून आले. आता या निकाला विरोधात हसापुरे बिराजदार गट काय भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### निंबर्गी ग्रा.प. निवडणूक छाननी प्रक्रिया